# अर्थबोधपत्रिका

आपल्या आजूबाजूस घडणाऱ्या विविध घटनांचा
'अर्थ'बोध करून देणारे मासिक

INDIAN SCHOOL OF POLITICAL ECONOMY
5/7/05
LIBRARY

३ • स्वागत
६ • नीलक्रांतीच्या पाऊलखुणा
१३ • रिझर्व्ह बँकेचे पैसाविषयक धोरण - पैलू वित्तीय स्थैर्याचा
२० • मोबाईलमुळे जगाचे आरोग्य धोक्यात
२४ • युरोप: बहुविध संस्कृती आणि इस्लाम
२९ • फ्रान्सः 'धर्मा'च्या मदतीने 'धर्मनिरपेक्षता' !
३२ • जिकडे-तिकडे (ई-कचरा)
३५ • 'काल'चे 'आज'साठी
• अर्थबोधपत्रिका पुरवणी (नागरीकरण व झोपडपट्ट्या)

खंड ४ : अंक ४ जुलै २००५

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**वार्षिक वर्गणी १००/- रुपये**

**(परदेशस्थ वाचकांसाठी $२०)**

वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/ पोस्टल ऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

---


**वर्गणीसाठी पत्ता :**

व्यवस्थापक,

**अर्थबोधपत्रिका,**

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**, अर्थबोध, ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, (रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.

फोन : २५६५७१३२

: २५६५७२१०

फॅक्स : २५६५७६९७

ई-मेल : ispe@vsnl.com


---


**अर्थबोधपत्रिका**

**खंड ४ (अंक ४) जुलै २००५**

**संपादक - रमेश पानसे**

**कार्यकारी संपादक - अभय टिळक**

**साहाय्यक संपादक - राज्यश्री क्षीरसागर**


◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, अशी आपणास विनंती आहे.

## 'अर्थबोधपत्रिके'तील माहिती कशी?

**जी सहज चाळता येईल अशी !**

◆भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेचे 'अर्थबोधपत्रिका' हे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय विषयांवरील माहितीपूर्ण लेखन देणारे प्रकाशन **वर्गणीदारांना दरमहा १० तारखेला पोस्टाने पाठविले जाते.**

◆मराठी वाचकांना विविध विषयांवर अभ्यासपूर्ण माहिती देणे आणि एखाद्या विषयाच्या सर्व बाजू निष्पक्षपणे व सोप्या शब्दांत देणे, हे या मासिकाचे उद्दिष्ट. ◆अनेक विषयांवरील सखोल माहिती व विश्लेषणात्मक लेख प्रसिद्ध करणारी जी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरची इंग्रजी भाषेतील नियतकालिके, पुस्तके व इंटरनेटसारखी माध्यमे आहेत, व ज्यांतील माहिती एरवी मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी माहिती मराठी वाचकांपर्यंत पोचविण्याचा हा प्रयत्न.

◆ अंकातील लेख आपण आपल्या नियतकालिकात / वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे. ◆लेख प्रसिद्ध झाल्यावर संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे किती तरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे. - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी.**

# स्वागत

**गे**ली पाच वर्षे अर्थबोधपत्रिकेचा संपादक म्हणून काम करण्याची संधी मला प्राप्त झाली. मी ती घेतली याचे कारण थोडेसे वैयक्तिक होते; पण अधिकतर शैक्षणिक होते. डॉ. आनंद नाडकर्णी हे माझे विद्यापीठीय शिक्षक. त्यांची विनंती मी अव्हेरू शकत नव्हतो. शिवाय त्यांच्याबरोबर आणि प्रा. नीळकंठ रथ यांच्याबरोबर काम करण्याचा मोहही मला खुणावीत होता. शैक्षणिक हेतू असा होता की, प्रा. नाडकर्णी आणि प्रा. रथ यांच्याबरोबरच्या चर्चेत अर्थबोधपत्रिकेचे स्वरूप - त्यांच्या मनात असलेले आणि पुढे चर्चेत अधिक नीटस झालेले - त्याच्या वेगळेपणानेच आकर्षक होते आणि मुख्य म्हणजे मला अधिक आणि विविधांगी अभ्यासाला प्रवृत्त करणारे होते.

इंग्रजीत प्रसिद्ध होणाऱ्या विविध विषयांमधील नवविचारांचा शोध घेणे, विविध शास्त्रांमधील नवनव्या शोधांचा वेध घेणे, जगात घडणाऱ्या वेधक घटनांचा, त्यांच्या वेगळ्या दृष्टिकोणांतून केलेल्या विश्लेषणांचा मागोवा घेणे आणि या साऱ्यांचा नेटकेपणाने अभ्यास करून त्यांवर मराठीतून माहितीवजा लेख लिहिणे, हे अंकाचे असणारे स्वरूप, मुळातच मासिकाला वेगळेपणा प्राप्त करून देणारे असे असणार होते. अशा वैचारिक कामात मला रस होता; पण त्याहीपेक्षा हे काम, मला व्यक्तिशः अनेकांगी विचारक्षेत्रांमध्ये अवगाहन करायला लावणार होते.

या ठरलेल्या स्वरूपाच्या दिशेने अर्थबोधपत्रिकेची गेल्या पाच वर्षांची वाटचाल झाली आहे की नाही हा निर्णय वाचकांचा. परंतु मला मात्र या वाटचालीत अनेक देश, अनेक शास्त्रे, अनेक ग्रंथ, इंटरनेटवरील अनेक तऱ्हेचे वाङ्मय या साऱ्यांचा प्रवास करायला मिळाला. त्यातील वैचारिक अनुभवांवर बऱ्यापैकी लेखन करायला मिळाले. अर्थबोधपत्रिकेच्या संपादनाच्या निमित्ताने मागील पाच वर्षे छान वैचारिक वातावरणात पण खूप गडबडीत गेली.

गेल्या पाच वर्षांमध्ये पत्रिकेचे पन्नास अंक प्रकाशित करण्याचे भाग्य मला लाभले. यात काही खास नि खोलवरच्या अभ्यासांतून सादर केलेले विशेषांकही होते. वास्तविक पन्नास अंक संपादित करणे ही काही फारशी

*(पान ५ वर पाहावे)*

# वाचकांचा प्रतिसाद

अर्थबोधपत्रिकेचे दोन अंक माझ्याकडे आले. माझी वर्गणी कोणी भरली हे मला कळले नाही. तथापि ज्याचे पान न् पान वाचनीय आहे आणि जे वाचत असताना अंक वाचून कधी संपला हे कळत नाही ही किमया आपल्या वेचक, वेधक व विचारप्रवर्तक मजकूर निवडीच्या कल्पकतेची आहे. आपले करावे तेवढे अभिनंदन कमीच होय.

आपल्या प्रत्येक अंकातला सुबोधपणा हा वाखाणणीय होय. पण मे २००५ च्या अंकातील 'सायन्स न्यूज'मधील 'स्मृती आणि विस्मृती' हा अनुवाद मात्र दुर्बोध व क्लिष्ट वाटला. माझ्या हैदराबादच्या स्नेह्यांसाठी वर्गणी पाठवीत आहे.

**दा. गो. देशपांडे, पुणे.**

अर्थबोधपत्रिकेचा मी पहिल्यापासून वर्गणीदार आहे. आपले सारे अंक उत्तम व संग्राह्य आहेत. ही पत्रिका नेहमीच सकस खुराक (मेंदूचा) पुरवीत असते. आपण राखत असलेल्या दर्जाबद्दल आपले अभिनंदन.

**विनायक श्रीकृष्ण महाजन, कुडावळे, ता - दापोली.**

अर्थबोधपत्रिकेचे अंक वाचनीय असतात. मेंदूसंशोधन विशेषांक आवडला.

**श्रीराम महाडिक, वडवली, ता - दापोली.**

अर्थबोधपत्रिकेचे अंक वाचनीय व ज्ञानगर्भ असतात.

**विनायक कानेटकर, नागपूर.**

जून २००५ च्या अर्थबोधपत्रिकेतील अर्थउद्योग या सदरांतर्गत 'बेंगळूरच्या नागरी समस्यांचे मूळ' हा लेख वाचला. बेंगळूरच्या पायाभूत सेवासुविधांवरील ताण वाढत आहे; वाढतोच आहे हे प्रत्यक्ष अनुभवायास मिळाले. बेंगळूर हे उद्यानांचे शहर आहे, असे म्हणतात ते खरेच आहे. परंतु, पंधरा -वीस वर्षांपूर्वीची स्थिती आणि आताची स्थिती यांत खूपच बदल झाला आहे, असे तेथील रहिवाशी अनुभवतात. शहराचे उन्हाळ्यातील तापमान वाढत आहे. पक्षीजीवनावर त्याचा परिणाम होतो आहे. बेंगळूरमधील वास्तव्यात मला चिमण्या आढळल्या नाहीत.

शहरात वाढणाऱ्या नवीन इमारतींमध्ये पोलाद व सिमेंटचा वाढता वापर, वाहनांची वाढलेली संख्या, प्रदूषण इत्यादींमुळे उष्णतामान वाढत आहे. आपण प्रसिद्ध केलेल्या लेखात पर्यावरणाच्या दृष्टिकोणातून बेंगळूरचे भवितव्य काय असेल, या पैलूवरही प्रकाश टाकावयास हवा होता. **बी. के. कुळकर्णी, अहमदनगर.**

(पान ३ वरून)
मर्दुमकीची गोष्ट नव्हे. मात्र ती आनंददायक गोष्ट होती हे मला आवर्जून सांगितले पाहिजे. अर्थबोधपत्रिकेचा पंचवार्षिक आढावा याच अंकात घेण्याचे कारण असे की, पत्रिकेच्या संपादनाच्या कामातून मी आता निवृत्त होत आहे. हा जुलै २००५ चा अंक हा माझ्या संपादनाखाली प्रकाशित होणारा शेवटचा अंक आहे.

ऑगस्टपासून पत्रिकेची सूत्रे माझे निकटचे स्नेही, श्री. अभय टिळक हे घेत आहेत. टिळक हे अर्थशास्त्राच्या आणि त्यातही प्रामुख्याने संशोधनाच्या क्षेत्रात भरपूर अनुभव घेतलेले असे आमचे मित्र आहेत. मराठी वृत्तपत्रांच्या क्षेत्रातील त्यांचा पत्रकारितेचा अनुभव, अर्थबोधपत्रिकेच्या संपादनात उपयोगी पडणारा आहे. इंग्रजी व मराठी भाषेवरील त्यांचे प्रभुत्व, पत्रिकेला अधिक उंचीवर नेणारे ठरेल याविषयी मला खात्री आहे. शिवाय अर्थबोधपत्रिकेच्या आजवरच्या वाटचालीत संपादकांच्या बरोबरीने योगदान देणाऱ्या श्रीमती राज्यश्री क्षीरसागरही त्यांच्याबरोबर आहेत. गेल्या पाच वर्षांमधील पत्रिकेच्या यशात क्षीरसागरांचा वाटा मोठा आणि महत्त्वाचा आहे. श्री. अभय टिळक यांना त्यांचे साहाय्य मोलाचे ठरेल याची खात्री आहे. अलीकडचा मेंदूसंशोधन विशेषांक काढण्यात श्रीमती गिरीजा बेल्हेकर यांची मदतही आवर्जून नमूद करावी अशी आहे. तयार झालेली अर्थबोधपत्रिका दर महिन्याला आपल्यापर्यंत वेळेवर पोहोचावी यासाठी वितरणव्यवस्था चोखपणे राबविणाऱ्या संस्थेतील अन्य सहकाऱ्यांचे सहकार्यही तितकेच मोलाचे.

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी ही अर्थबोधपत्रिकेची पालकसंस्था आहे. तिच्या नियंत्रणमंडळावर मी असल्यामुळे मी या संस्थेच्या सर्वच मान्यवर सदस्यांच्या समवेत असणार आहे. त्यामुळे पत्रिकेशीही संबंधित असणार आहे; पण आता वाचक म्हणून अधिक.

पत्रिकेच्या वाचकांना पत्रिकेच्या सूत्रसंचलनात होणारा हा बदल कळवावा आणि त्यांचा निरोप घ्यावा हेच या अंकाच्या संपादनाचे प्रयोजन.

कृषी-उद्योग

# नीलक्रांतीच्या पाऊलखुणा

हरित क्रांतीने कृषी क्षेत्राचा चेहरामोहरा पार पालटून टाकला. त्या पाठोपाठ लाट आली दुग्धोत्पादन व्यवसायाचा कायापालट घडविणाऱ्या धवल क्रांतीची. आता, मत्स्याहारप्रेमींचा आनंद उचंबळून यावा अशी पुढची लाट येऊ घातली आहे...नीलक्रांतीची! या बदलाचे अग्रदूत आहेत.....मासे. निळ्या निळ्या शार पाण्यात माशांची निपज होते म्हणूनच या नवीन परिवर्तनाचे वर्णन 'नीलक्रांती' या शब्दाने केले जाते.

अन्नधान्याच्या उत्पादनात उपयोजिल्या जाणाऱ्या तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात गेल्या अर्ध शतकभराच्या कालावधीत महत्त्वपूर्ण असे अनेक बदल घडून आले आहेत. तृणधान्यांच्या गटात गहू तसेच तांदुळाची नवीन प्रकारची बियाणे विकसित करण्यात आली. जमीनीतून मिळणारी पोषकद्रव्ये भरपूर प्रमाणात शोषून घेऊन, त्यांचे रूपांतर धान्योत्पादनाच्या वाढीत घडवून आणण्याची क्षमता या बियाणांच्या ठायी होती व आहे. जुन्या पारंपरिक बी-बियाणांच्या ठायी ही किमया नव्हती. जमिनीतील तसेच खतांद्वारे मिळणारी पोषकद्रव्ये पिकांद्वारे शोषली जाण्याचे प्रमाण हे लागवडीखालील जमिनीतील ओलाव्याच्या मात्रेवर अवलंबून असते. साहजिकच, सिंचनाची हमी असलेल्या जमिनींवरच या नवीन वाणांची पेरणी होऊ लागली. हरित क्रांतीचा पाया हाच आहे.

अशाच प्रकारची क्रांती पोल्ट्री उत्पादनांच्या (अंडी तसेच कोंबड्यांचे मांस - चिकन) संदर्भातही घडून आली. शेळी, मेंढी अथवा गोवंशियांच्याद्वारे मिळणाऱ्या मटन वा मांसापेक्षाही चिकन हे अधिक महागडे असते, असाच जगभरचा अनुभव आहे. गेल्या ४०-४५ वर्षांपूर्वीपर्यंत हीच परिस्थिती होती. परंतु, अलीकडे मात्र हे वास्तव बदलते आहे. आता कोंबड्यांच्या नवीन जाती अस्तित्वात आल्या आहेत. वर्षाकाठी अधिक अंडी देणाऱ्या कोंबड्यांच्या प्रजाती आता शेतकऱ्याला मिळतात. अधिक अंडी देणाऱ्या कोंबड्यांच्या या जाती-प्रजातींप्रमाणेच कोंबडीखाद्यातून मिळणारी पोषणद्रव्ये शोषून घेऊन त्यांचे रूपांतरण अधिक वेगाने आणि अल्पकाळातच मांसल पेशींमध्ये - चिकनमध्ये करणारे वाणही तयार झाले. परिणामी, अंडी तसेच चिकन यांच्या उत्पादनात भरीव वाढ होऊन चिकनच्या किंमतीमध्ये सातत्याने घसरण घडून

आली. भारतीय पोल्ट्री उत्पादनांच्या संदर्भात हे दोन्हीही बदल दृग्गोचर होतात. अशाच प्रकारचे परिवर्तन आता घडून येते आहे ते मत्स्योत्पादनाच्या प्रांतात.

मत्स्याहारप्रेमींना आज मासळीचा पुरवठा होतो तो दोन मार्गांनी. समुद्र, नद्या, ओढे यांसारखे नैसर्गिक स्रोत अथवा मानवनिर्मित जलाशय हा मासळीच्या पुरवठ्याचा एक मुख्य मार्ग. यातील बहुतांश मासळी ही खाऱ्या पाण्यातील. गोड्या पाण्यातील मासळीचे यातील प्रमाण तसे फारच अल्प असते. मासळीची ही वाढ नैसर्गिक होते. भक्षणासाठी ज्याप्रमाणे माणूस जंगलात शिकार करतो त्याच धर्तीवर नद्या -समुद्रांत निसर्गतः वाढणाऱ्या माशांची मासेमारी केली जाते. परंतु, या मासळीच्या वाढीमध्ये माणसाचा कोणताही सहभाग नसतो. ही शुध्द 'मासेमारी'च गणावयास हवी. लहान लहान तळी अथवा बंधाऱ्यांमध्ये मत्स्यबीज सोडून त्यांद्वारे केली जाणारी मत्स्यशेती, हा मासळीच्या उत्पादनाचा दुसरा मार्ग. टाकी, तळे, हौद अथवा बंधाऱ्यात सोडलेल्या मत्स्यबीजाचे पोषण टाकाऊ, कुजका, सडलेला भाजीपाला वा तत्सम पदार्थांद्वारे करून पूर्ण वाढ झालेली मासळी नंतर पकडणे, हा प्रकार 'मत्स्यपालन' या वर्गात मोडतो.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या अन्न व कृषी संघटनेच्या अंदाजानुसार जगभरातील एकूण मत्स्योत्पादनात तब्बल तीन-चतुर्थांश हिस्सा आहे तो समुद्रातील मासळीचा. २००० साली अशा मासळीचे जगभरातील मान साडेनऊ कोटी मेट्रिक टन एवढे होते! अतिरिक्त मासेमारीपायी समुद्रातून गोळा होणाऱ्या मासळीच्या प्रमाणात घट होत असल्याचे, काही तज्ज्ञांचे निरीक्षण आहे. खाऱ्या पाण्यातील मासळीच्या काही प्रजाती तर एवढ्या दुर्मिळ बनल्या आहेत की त्यांचे बाजारभाव सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर गेले आहेत. केवळ धनवानांनाच आता त्या मासळीची लज्जत चाखता येते.

भारताच्या संदर्भात बोलावयाचे तर अरबी समुद्र आणि बंगालचा उपसागर ही मासेमारीची दोन मुख्य आगरे आहेत. त्यातही पुन्हा खोल समुद्रातील मासेमारीचे प्रमाण आपल्या देशात अल्पच आहे. समुद्रातून पकडून आणलेले मासे साठवून ठेवण्याची शीतगृहासारखी सुविधा असणाऱ्या बोटींची अगदी अलीकडेपर्यंत असणारी वानवा, हे त्यामागील मुख्य कारण होते. परिणामी, भारतातील मासळीखवय्यांना आजही खोल समुद्रातील मासळीचा तितकासा परिचय नाही. या मासळीचे सेवन करण्याबाबत रूची निर्माण होण्यासही बराच अवधी लागतो. त्यामुळे, किनारपट्टीपासून सुमारे आठ ते दहा मैलांच्या टापूतच मुख्यतः आपले मच्छिमार मासेमारीसाठी जाळी

फेकतात. वर्षभरात समुद्रातील मासेमारींद्वारे गोळा होणाऱ्या मासळीच्या प्रमाणालाही मर्यादा आहेत. देशाच्या पश्चिम किनारपट्टीवरील प्रदेशात मोठमोठ्या यांत्रिक बोटींद्वारे (ट्रॉलर्स) लहान-मोठ्या अशा सर्वच माशांची सरसकट पकड केल्याने त्यानंतरच्या काही वर्षांत मासळीचा तुटवडा जाणवल्याचे अनुभवास आले आहे. भारताच्या पूर्व किनारपट्टीवरील परिस्थिती जरा निराळी आहे. समुद्राला येऊन मिळणाऱ्या मोठ्या नद्यांद्वारे समुद्रात वाहून येणारा गाळ किनारपट्टीवर साचल्याने, माशांचे खाद्य असणाऱ्या सूक्ष्म वनस्पती व जीवजंतूंची वाढ खुंटते व त्याचा परिणाम मासळीच्या वाढीवर होतो. परिणामी, पूर्व किनारपट्टी ही मासेमारीसाठी तितकीशी अव्वल ठरत नाही.

तळी, बंधारे अथवा हौदांमध्ये मत्स्यबीज टाकून मत्स्यशेतींद्वारे मिळणाऱ्या मासळीचे प्रमाण जगभरात एकूणांत केवळ २५ टक्केच होते. ही आकडेवारीही पुन्हा २००० सालातील आहे. वाढत्या उत्पन्नाबरोबर बाजारपेठेत मासळीला असणारी मागणीही वाढत आहे. मटन अथवा चिकन यासारख्या पारंपरिक सामिष आहाराद्वारे (रेड मीट) निपजणाऱ्या स्थूलता तसेच हृदयविकारासारख्या समस्यांचे धोके ध्यानात आल्याने मासळीकडे वळणाऱ्यांचे प्रमाणही वाढते आहे. याहीमुळे मासळीच्या मागणीत भर पडते आहे. समुद्रातील मासेमारींद्वारे मिळणाऱ्या मासळीला मर्यादा आहेत. या मासळीचे प्रमाणही अलीकडील काही वर्षांत घटत असल्याचे आढळून येते आहे. त्यामुळे, बाजारपेठेतील मासळीच्या वाढत्या मागणीचा रेटा निभावून नेण्यासाठी मत्स्यशेतीच्या मार्गाने उपलब्ध होणाऱ्या मासळीच्या पुरवठ्यात वाढ घडवून आणणे आवश्यक ठरते.

अलीकडील काही वर्षात, मत्स्यशेतींद्वारे मिळणाऱ्या मासळीचे उत्पादन दरवर्षी सरासरी दहा टक्क्यांनी वाढत असल्याचे दिसते. सर्व जगभरच हा अनुभव येतो. यातील मोठी वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे, मत्स्यशेतींद्वारे जगभर उत्पादित होणाऱ्या एकूण मासळीपैकी तब्बल ८० टक्के मासळीचे उत्पादन एकट्या चीनमध्ये होते. गेल्या २० वर्षांचा विचार केला तर असे अनुभवास येते की या मार्गाने मिळणाऱ्या मासळीचे उत्पादन चीनमध्ये दरवर्षी ११ टक्के दराने वाढत होते. उर्वरित जगामध्ये वाढीचा हाच वेग होता पाच टक्के. मत्स्यशेतींद्वारे मिळणाऱ्या मासळीचे चीनसंदर्भातील जे मोजमाप उपलब्ध होते त्यापेक्षा प्रत्यक्षात किती तरी अधिक उत्पादन तेथे होते, असा जाणकारांचा कयास आहे. ते काहीही असो, मुख्य मुद्दा हा की, मासळीच्या मागणी तसेच पुरवठ्याच्या वाढीचे जगभर जे चित्र दिसते त्यावरून, आगामी ३०

वर्षांत लोकांच्या आहारात येणाऱ्या मासळीमध्ये बहुतांश मासळी ही मत्स्यशेतीद्वारे उत्पादित मासळीच असेल, असा निष्कर्ष काढण्यास प्रत्यवाय नाही. भारताप्रमाणेच चीनमध्येही लहान तळी, हौद अथवा बंधाऱ्यांमध्ये मत्स्यशेती केली जाते. तळी अथवा हौदांमध्ये मत्स्यबीज सोडले जाते. वाया गेलेले अथवा नासलेले अन्न यांचा मत्स्यखाद्य म्हणून वापर करून त्यावर या मत्स्यबीजाचे पोषण केले जाते. मात्र, युरोप, अमेरिका तसेच चिलीसारख्या काही दक्षिण अमेरिकी देशांमध्ये मत्स्यशेतीच्या क्षेत्रात गेल्या दशकभरात अनेक नवीन पध्दती तसेच तंत्रांचा वापर होऊ लागला आहे.

या नवीन तंत्र-मंत्रांमुळे मासळीच्या उत्पादनातही भरीव वाढ घडून आली आहे. सामन आणि कॉड या प्रजातींच्या माशांना या देशांमध्ये मोठ्या प्रमाणावर मागणी असते. मत्स्याहारप्रेमिकांच्या दृष्टीने या दोन प्रजातींचे मासे म्हणजे जणू पर्वणीच. समुद्रात आढळून येणारे हे मासे अंडी मात्र नदीत घालतात. ही मासळी बव्हंशी हंगामी स्वरूपाची आहे. बाजारपेठेत यांना मिळणारा भावही तुलनेने अधिक असतो. आता मात्र, या माशांची उपज तळी अथवा बंधाऱ्यांमध्ये घडवून आणण्याचे तंत्रज्ञान विकसित झाले आहे. नॉर्वे, स्कॉटलंड, कॅनडा, अमेरिका, चिली यासारख्या परंपरागत सामनप्रेमी देशांत हे तंत्रज्ञान व मत्स्यशेतीसाठी विकसित करण्यात आलेली अशी तळी आज जागोजाग दिसतात. तळ्या-बंधाऱ्यांमध्ये उपज व वाढ होऊ शकणारी सामन माशांची प्रजाती विकसित करण्यात आली आहे. या माशांच्या पोषणासाठी आवश्यक असणारे खाद्य तयार करण्यात येऊन त्याच्या चाचण्याही घेऊन झाल्या. हे सर्वच तंत्रज्ञान आता सुविहित आणि प्रस्थापित झाले आहे. या तंत्राचा अपेक्षित व सुभग परिणामही दिसू लागला आहे. सामन माशांचा पुरवठा वर्षभर सुरळित व्हावा इतपत त्यांचे उत्पादन आता वाढले असून, परिणामी, पश्चिमी राष्ट्रांच्या बाजारपेठांतील या माशांच्या किंमतींतही लक्षणीय घसरण झाली आहे.

नेमकी हीच प्रक्रिया खाऱ्या पाण्यात वाढणाऱ्या कोळंबीच्या बाबतीतही घडून आली आहे. समुद्रानजिकच तयार करण्यात आलेल्या छोट्या तळ्यांमध्ये कोळंबीची मत्स्यशेती आता केली जाते. जगभरात सर्वत्र या प्रयोगामुळे कोळंबीच्या उत्पादनात घसघशीत वाढ झाल्याचे दिसून येते. या प्रगतीच्या पाऊलखुणा आता भारतातही उमटत आहेत. मात्र, याप्रकारे केल्या जाणाऱ्या मत्स्यशेतीचे पर्यावरणीय तसेच अन्य प्रकारचे धोकेही आता दृग्गोचर होऊ लागले आहेत. ज्या तळ्यांमध्ये या कोळंबीची तसेच सामनची पैदास केली जाते त्या तळ्यात जमीन तसेच पाणी यांना हानिकारक

ठरणारी द्रव्ये तयार होतात. तळे अथवा बंधाऱ्याचा कठडा तुटल्याने, अथवा तळ्याच्या संरक्षक भिंतींना तडे गेल्याने तळ्यातील सामन शेजारील पाण्याच्या नैसर्गिक झऱ्यात प्रविष्ट झाले तर झऱ्याच्या पाण्यातील माशांच्या पारंपरिक जाती-प्रजाती ते नामशेष करून टाकतात. लहान लहान मासे हे सामनचे भक्ष्य असतात. त्यामुळे, समुद्रातील मानवी आहारयोग्य अथवा अयोग्य असे लहान लहान मासे पकडून, वाळवून, त्यांची पावडर बनवून त्याद्वारे तयार होणारे खाद्य तळ्यांमध्ये पाळलेल्या सामन माशांना खाऊ घालण्यात येते. यातून, खाऱ्या पाण्यातील माशांची उपज खुंटण्याचा दीर्घकालीन धोका संभवतो. मोठ्या आकाराच्या कोळंबीची (टायगर प्रॉन्स) पैदास करण्यासाठी नद्यांच्या त्रिभुज प्रदेशात असणारी तिवराची जंगले साफ करून तिथे तळी बांधण्याचा धडाका आज जगभरात चालू आहे. व्हिएतनाममधील तिवरांची जवळपास तीन-चतुर्थांश जंगले आज या तडाख्यात भुईसपाट झाली आहेत. कोळंबीच्या उत्पादनात व्हिएतनामचा जगात पाचवा क्रमांक लागतो. भारतातही महानदी व गोदावरीच्या त्रिभुज प्रदेशात याच प्रक्रियेची लागण होण्यास प्रारंभ झाला आहे.

मत्स्यशेतीमुळे उद्‌भवणाऱ्या या समस्यांना तोंड देण्यासाठी अनेक ठिकाणी आज संशोधन सुरू आहे. कोळंबीच्या आज प्रचलित असणाऱ्या जाती-प्रजातींद्वारा तयार होणारी हानिकारक, अनिष्ट द्रव्ये कमी प्रमाणात प्रसवणारी मोठ्या आकाराच्या कोळंबीची एक प्रजात फ्लोरिडामधील मत्स्य संशोधकांनी तयार केली आहे. कोळंबी पाळलेल्या तळ्यात अथवा हौदात 'टिलापिया' नावाचे मासे सोडले जातात. तळ्यात निर्माण होणारे अवशिष्ट पदार्थ, हे मासे बऱ्याच अंशी फस्त करतात. या अन्नावरच त्यांचे पोषण होते. त्यांचे आकारमान वाढते. तळ्याची स्वच्छता राखण्याबरोबरच या माशांच्या रूपाने मत्स्यपालक शेतकऱ्यास आणखी एक विक्रीयोग्य उत्पादनही मिळते. पोषणासाठी कमी अन्नद्रव्ये लागणाऱ्या, तुलनेने अल्प आहार असणाऱ्या आणि कमी काळात वाढ पूर्ण होणाऱ्या अशा सामन माशांच्या प्रजाती विकसित करण्याच्या दिशेने सध्या संशोधन चालू आहे. गहू तसेच तांदुळाच्या अधिक उत्पादन देणाऱ्या जाती अथवा वाण विकसित करण्यामागे जो दृष्टिकोण होता तोच या संशोधनामागे आहे. पर्यावरणाला घातक ठरणाऱ्या, नायट्रोजन या वायूचे उत्सर्जन कमी प्रमाणात करणाऱ्या अशा या जाती आहेत.

आज तरी, खाऱ्या पाण्यातील माशांच्या काही जाती -प्रजाती आणि जगाच्या समशीतोष्ण कटिबंधापुरतीच ही नीलक्रांती सीमित आहे. भारत अथवा चीनमध्ये

गोड्या पाण्याच्या तळ्यांत पैदास केल्या जाणाऱ्या माशांच्या पारंपरिक वाणांमध्ये या प्रकारची विकास प्रक्रिया अद्यापपावेतो गतिमान झालेली नाही. मत्स्यशेतींद्वारे पैदास करता येण्याजोग्या एका प्रांतातील माशांच्या वाणांचा प्रसार दुसऱ्या प्रांतात करणे, मत्स्यशेतीसाठी बांधलेली तळी अथवा बंधारे यांच्या संख्येत भर पडणे याच मार्गांनी भारतातील मत्स्यशेतीचा पैस आज विस्तारताना दिसतो. आंध्र प्रदेश तसेच पश्चिम बंगालसारख्या राज्यांत अतिशय मोठ्या प्रमाणावर, तर गुजरातसारख्या राज्यात काही प्रमाणात आज मत्स्यशेतीचा अंगिकार लोकांनी केला आहे. आज, मुंबई, दिल्ली, कोलकातासारख्या महानगरांप्रमाणेच ईशान्येकडील राज्यांसारख्या सुदूर प्रदेशातील बाजारपेठा या आंध्र प्रदेशाच्या किनारपट्टीवरील भागांत कसल्या जाणाऱ्या मत्स्यशेतीत पैदास झालेल्या माशांनी व्यापल्या आहेत. परंतु, गोड्या पाण्यात वाढणाऱ्या पारंपरिक माशांचे प्रगत वाण मात्र अजूनही विकसनाच्या गर्भात आहे. मत्स्यशेतीसाठी उत्सुक असणाऱ्या शेतकऱ्यांना त्यासाठी प्रतीक्षा करावी लागेल.

*(संदर्भ - इंटरनेट, द इकॉनॉमिस्ट )*

## देशभरातील शाकाहार-मांसाहारप्रेमींचे मोजमाप

भारतीयांच्या खाण्यापिण्याच्या सवयी नेमक्या आहेत तरी कशा, हे जाणून घेण्याच्या उद्देशाने मुंबई येथील इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पॉप्युलेशन स्टडीज् या संस्थेने १९९८-९९मध्ये राष्ट्रीय पातळीवर एक पाहणी केली. मटन, चिकन, मासे यासारखे सामिष पदार्थ तर सोडाच; परंतु, अंडेसुद्धा कधीही न खाणाऱ्या महिलांचे राज्यवार प्रमाण किती आहे याची अंदाजित आकडेवारी या अभ्यासाने तयार केली. घरातील गृहिणीच जर शाकाहारी असेल तर ते संपूर्ण कुटुंबच परंपरेने शाकाहारी असले पाहिजे, असा तर्क आपण त्यावरून बांधू शकतो. या तर्कानुसार, देशभरात शाकाहारी कुटुंबांचे प्रमाण एकूणांत किती असेल याचा अदमास देणारी अतिशय उद्बोधक अशी राज्यवार आकडेवारी पुढील पानावरील तक्त्यात दिली आहे. अंडे न खाणाऱ्यांची आकडेवारी वेगळी दिली आहे, कारण काही प्रांतांत आहारात कोंबडी अथवा अंडे हे निषिद्ध मानले जात असले तरी मासळी मात्र वर्ज्य नसते. या पाहणीवरून असे दिसते की -

- देशभरातील जवळपास एक तृतीयांश कुटुंबे शाकाहारी आहेत.
- संपूर्ण पूर्व भारत आणि देशाच्या पूर्व तसेच पश्चिम किनारपट्टीवरील राज्ये मुख्यत्वे सामिषप्रेमी आहेत.
- गुजरात, राजस्थान, हरयाना व पंजाब या राज्यांत शाकाहारप्रेमी बहुसंख्य आहेत.

# भारतात शाकाहारी कुटुंबे आहेत तरी किती ?

| राज्य | आहारात चिकन, मटन वा मासे यांचा कधीच समावेश नसणाऱ्या कुटुंबांची टक्केवारी | आहारात अंड्यांचा समावेश न करणाऱ्या कुटुंबांची टक्केवारी |
|---|---|---|
| अरुणाचल प्रदेश | १.२ | ७.८ |
| नागालँड | ०.० | १.३ |
| मिझोराम | ०.७ | २.३ |
| मणिपूर | १.७ | १४.० |
| मेघालय | २.० | ८.४ |
| आसाम | २.२ | ४.५ |
| त्रिपुरा | २.६ | ८.३ |
| पश्चिम बंगाल | २.२ | ९.६ |
| ओडिशा | ६.५ | २६.३ |
| सिक्किम | १०.३ | २०.९ |
| बिहार | १३.२ | १९.६ |
| आंध्र प्रदेश | ८.५ | ९.८ |
| तामिळनाडू | ४.६ | ५.५ |
| केरळ | ३.६ | १६.१ |
| गोवा | ५.० | १९.० |
| कर्नाटक | २८.४ | २७.६ |
| **महाराष्ट्र** | **३३.१** | **३५.२** |
| मध्य प्रदेश | ४८.६ | ५१.४ |
| छत्तीसगढ | १९.९ | २२.१ |
| गुजरात | ७१.३ | ७१.८ |
| राजस्थान | ७५.२ | ७८.२ |
| हरयाना | ८२.५ | ८०.२ |
| पंजाब | ७२.६ | ६८.५ |
| जम्मू व काश्मीर | २५.० | ३६.८ |
| हिमाचल प्रदेश | ४८.२ | ४८.३ |
| दिल्ली | ५१.० | ४४.९ |
| उत्तरप्रदेश | ४८.३ | ५०.३ |
| **भारत** | **३०.८** | **३४.२** |

आर्थिक

# रिझर्व्ह बँकेचे पैसाविषयक धोरण-पैलू वित्तीय स्थैर्याचा

अर्थव्यवस्थेतील चलनपुरवठा, पतपुरवठा आणि एकूणच वित्तीय व्यवहारांचे नियमन होऊन त्यांची सांगड विकासविषयक अन्य धोरणांशी सुविहितपणे घातली जावी, यासाठी रिझर्व्ह बँक एक वार्षिक धोरण तयार करते. नवीन आर्थिक वर्षाच्या प्रारंभी या धोरणाची घोषणा होते. त्यानंतर नोव्हेंबरमध्ये त्याचा मध्यावधी आढावा घेतला जातो. १ एप्रिल २००५ पासून सुरू झालेल्या चालू आर्थिक वर्षासाठीचे रिझर्व्ह बँकेचे धोरण २८ एप्रिल २००५ रोजी सादर झाले. २००५ -०६ या आर्थिक वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेचे स्वरूप कसे असेल, याबाबतच्या ठोकताळ्यांच्या चौकटीत त्याची आखणी झाली आहे. स्थूल अंतर्देशीय उत्पादन (ग्रॉस डोमेस्टिक प्रॉडक्ट - जी.डी.पी.), भाववाढ, पैशाचा पुरवठा व त्यातील बदल, रूपयाचा विनिमय दर, व्याज दर आणि वित्तीय स्थैर्य हे त्या चौकटीचे मुख्य पैलू. त्या पैलूंसंदर्भातील हे विवेचन.

**(१) स्थूल अंतर्देशीय उत्पादनातील वाढः** २००५-०६ या वर्षामध्ये स्थूल अंतर्देशीय उत्पादनामधील वाढ सात टक्क्यांची असेल, असा अंदाज आहे. पावसाची परिस्थिती सर्वसामान्य राहील, अशी अपेक्षा ठेवल्यास शेती क्षेत्राच्या उत्पादनात मागच्या वर्षीच्या तुलनेत तीन टक्क्यांनी वाढ होईल, असे गृहीत धरले आहे. उद्योग आणि सेवा क्षेत्रांच्या वाढीचे दर, मागच्या वर्षीप्रमाणेच, अनुक्रमे, ८ टक्के आणि ८.६ टक्के असे राहतील, अशी अपेक्षा आहे. एकूण स्थूल अंतर्देशीय उत्पादनामधील शेती, उद्योग आणि सेवा या क्षेत्रांचा वाटा अनुक्रमे, ढोबळमानाने १/४, १/४ आणि १/२ आहे, हे लक्षात घेतल्यास, एकूण स्थूल अंतर्देशीय उत्पादनामधील वाढ सात टक्क्यांपेक्षा थोडीशी अधिक असेल अशी अपेक्षा आहे. प्रत्यक्षात मात्र, शेती क्षेत्राच्या उत्पादनवाढीचा सरासरी दर, गेल्या काही वर्षांमध्ये दोन टक्के इतकाच असल्यामुळे एकूण स्थूल अंतर्देशीय उत्पादनाचा वाढीचा दर चालू वर्षामध्ये सात टक्क्यांपेक्षा कमी राहण्याचीच शक्यता आहे.

**(२) भाववाढीचा दर :** २००४-०५ या आर्थिक वर्षामध्ये ठोक किंमत निर्देशांकावर आधारलेली भाववाढ सुमारे पाच टक्के इतकी होती. भाववाढीवर दोन

दबाव असणार आहेत: एक, पुरवठ्याच्या बाजूने - यात, कच्च्या खनिज तेलाची किंमतवाढ आणि जगभरची भाववाढ, वस्तूंच्या किंमती या घटकांचा समावेश आहे. दुसरा, मागणीच्या बाजूने - यात, लोकांजवळ मोठ्या प्रमाणात असणारी रोखता आणि भविष्यकाळात किंमती आणखीनच वाढतील अशा ग्राहकांच्या असणाऱ्या अपेक्षा या घटकांचा अंतर्भाव आहे. या दोन दबावांमुळे भविष्यकाळात भाववाढीचा दर आणखीनच वाढण्याची शक्यता आहे. पण याला दुसरीही एक बाजू आहे, आणि तीही लक्षात घ्यायला हवी. गेल्या काही वर्षांमध्ये अन्नधान्याच्या साठ्यात बरीच मोठी वाढ झाली आहे. त्याचबरोबर, विदेशी विनिमयाच्या गंगाजळीतही फार मोठी वाढ झाली आहे. हे दोन घटक भाववाढीवर विरुध्द दिशेने परिणाम करतील. म्हणजे ते भाववाढीच्या दरात फार मोठी वाढ घडून येऊ देणार नाहीत. या उभय बाजूंचा एकत्रित विचार केल्यावर रिझर्व्ह बँकेचा असा अदमास आहे की २००५-०६ मधील भाववाढीचा दर मागच्या वर्षीपेक्षा जास्त राहील आणि तो सुमारे ५.५ टक्के इतका असेल.

पण इथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे, ठोक किंमत निर्देशांकातील दोन कालबिंदूंमधील बदलावर (point-to-point) आधारलेला मागच्या वर्षीचा भाववाढीचा दर पाच टक्क्यांपेक्षा कमी असला तरी भाववाढीच्या साप्ताहिक दरांची सरासरी खूपच जास्त, म्हणजे ६.५ टक्के इतकी होती. कारण भाववाढीचा दर कधीकधी आठ टक्क्यांपर्यंतही वाढला होता आणि अनेक आठवडे तो याच पातळीवर स्थिरही राहिला होता. यावरून असे वाटते, की २००५-०६ या वर्षामध्ये दोन कालबिंदूंमधील भाववाढीचा अपेक्षित दर जरी ५.५ टक्के इतका असला तरी सरासरी दर त्यापेक्षा जास्त राहण्याचीच शक्यता अधिक आहे, अगदी सात टक्केसुध्दा! विशेषतः, पुढील वर्षाच्या काळात तेलाच्या किंमतीमध्ये अजून वाढ झाली, तर भाववाढीचा दर ५.५ टक्क्यांपेक्षा जास्तच राहील.

३) पैशातील (**M3**) वाढ : २००३-०४ या वर्षासाठीच्या आपल्या चलन तसेच वित्तविषयक अहवालात रिझर्व बँकेने असा अंदाज व्यक्त केला होता की अलिकडच्या काही वर्षांमध्ये वास्तव पैशातील (M3/P)** वाढीचा दर स्थूल अंतर्देशीय उत्पादनामधील वाढीच्या दराच्या तुलनेत सरासरीने १.३ पट होता. हे ध्यानात घेता वर उल्लेखिलेली स्थूल अंतर्देशीय उत्पादनामधील अपेक्षित सात टक्क्यांची वाढ प्रत्यक्षात येण्यासाठी वास्तव पैशातील वाढ ७ x १.३ = ९.१ टक्के इतकी व्हायला हवी आणि चलनवाढीचा दर अपेक्षेप्रमाणे ५.५ टक्क्यांच्या आत ठेवायचा असेल तर

पैशामधील (M3 - नॉमिनल) वाढ ९.१ + ५.५ = १४.६ टक्के इतकी व्हायला हवी. म्हणूनच रिझर्व्ह बँकेच्या पैसाविषयक धोरणात या पैशामधील (M3) वाढ सुमारे १४.६ टक्के इतकी प्रस्तावित आहे. परिणामी, ठेवींमधील वाढ १५ टक्क्यांनी आणि बँकांच्या अन्नधान्येतर कर्जांतील व बिगर सांविधिक रोख्यांच्या (स्टॅट्यूटरी लिक्विडिटी) गुंतवणूकीमधील वाढ १९ टक्क्यांनी व्हावी, असे अभिप्रेत आहे.

पण एकूण स्थूल अंतर्देशीय उत्पादनामधील वाढ अपेक्षित सात टक्क्यांपेक्षा कमी राहिली, तर पैशातील या वाढीचा परिणाम म्हणून अर्थव्यवस्थेत अतिरिक्त रोखता (excess liquidity) निर्माण होईल. याउलट, पैशामधील (नॉमिनल) आवश्यक वाढ काढण्यासाठी दोन कालबिंदूंमधील भाववाढीच्या दराऐवजी भाववाढीचा सरासरी दर विचारात घेणे जरूर असल्यामुळे रोखतेत तूटही निर्माण होण्याची शक्यता आहे. म्हणूनच धोरण विधानात उल्लेख केल्याप्रमाणे, दर तीन महिन्यांनी पैशामधील आवश्यक वाढीचे पुनर्मूल्यांकन करणे अत्यंत आवश्यक आहे.

४) विनिमय- दर (**Exchange Rates**) : भारतीय अर्थव्यवस्थेत झालेल्या भरीव वाढीमुळे आणि २००४-०५ मध्ये तेलाच्या डॉलरमधील किंमती खूप वाढल्यामुळे, त्या वर्षी भारतात होणारी आयात खूप (म्हणजे, ३६ टक्क्यांनी) वाढली. त्याच काळात निर्यातीतील वाढ २७ टक्के इतकी होती. याचा परिणाम असा झाला की २००४-०५ या वर्षात वस्तूंच्या आयात-निर्यातीमध्ये २८.४ अब्ज डॉलरची तूट निर्माण झाली. परंतु, २१ अब्ज डॉलरच्या सेवारूप निव्वळ निर्यातीमुळे चालू खात्यावरील तूट बऱ्याच प्रमाणात भरून निघाली. तरीही, २००३-०४ मध्ये चालू खात्यात जे ४.८ अब्ज डॉलरचे आधिक्य (surplus) होते, त्याचे रूपांतर २००४-०५ मध्ये तुटीत (deficit) झाले. परंतु एप्रिल-डिसेंबर २००४च्या काळात निव्वळ भांडवल आयात (net capital inflow) २० अब्ज डॉलर इतकी झाली. त्यामुळे चालू खात्यातील ही तूट भरून निघून विशेषतः अलीकडील महिन्यात भारतीय रुपयावर अधिमूल्यनाच्या दिशेने दबाव आला. संपूर्ण वर्षाचा विचार केला तर मात्र रुपयाचे अवमूल्यनच झाले. अशा अवमूल्यनामुळे निर्यात अर्थातच वाढते, पण, दुसऱ्या बाजूने, भाववाढीवरील दबावही वाढतो. रुपयाचे अधिमूल्यन झाले तर त्यामुळे भाववाढ कमी होईल, पण त्याचबरोबर भारताच्या निर्यातीतील वाढही रोखली जाईल. येत्या वर्षी रिझर्व्ह बँकेस या द्वंद्वाला सामोरे जावे लागणार आहे. रुपयाचे आणखी अधिमूल्यन होऊ नये म्हणून रिझर्व्ह बँकेने भांडवली खात्याचे मर्यादित उदारीकरण केले आहे. उदाहरणार्थ, भारतीयांना

विदेशात अधिक गुंतवणूक करण्यास परवानगी देणे, स्वयंसहायता गटांना व्यापारी तत्वांवर विदेशातून कर्जे घेण्यास अनुमती देणे, इत्यादि. पण याबरोबरच, भारतीय रुपयाचे अधिक अधिमूल्यन होऊ द्यायचे नसेल तर, वाढत जाणाऱ्या विदेशी चलनांच्या साठ्याचा देशांतर्गत पायाभूत सुविधांमधील (investment in infrastructure) गुंतवणुकीला आणि या गुंतवणुकीद्वारे आर्थिक वाढीलाही चालना देण्यासाठी वेगाने सुविनियोग करणेही तितकेच महत्त्वाचे आहे, कारण त्यामुळे मिहिर रक्षित यांच्यासारख्या काही प्रथितयश अर्थशास्त्रज्ञांनी प्रतिपादन केल्यानुसार, अन्नधान्याचा, तसेच विदेशी-विनिमयाचा, मोठा साठा उपलब्ध असताना रिझर्व्ह बँकेने पैशाचा पुरवठा अधिक वाढविण्याचे धोरण स्वीकारायला हरकत नव्हती. देशातील पायाभूत सोयींच्या क्षेत्रात वाढती गुंतवणूक करण्यासाठी रिझर्व्ह बँकेने सरकारला बऱ्याच मोठ्या प्रमाणात कर्ज पुरविणे शक्य आहे.

५) व्याज-दर (**Interest rates**) : रिझर्व्ह बँकेने, बाजार स्थिरीकरण योजनेखालील व इतर सरकारी रोख्यांच्या खुल्या बाजारातील विक्रीद्वारे विदेशी चलनाच्या आयातीच्या प्रभावलोपनासाठी (sterilization) मोठ्या प्रमाणावर व्यवहार केले नसते, तर, भांडवलाच्या मोठ्या प्रमाणात झालेल्या निव्वळ आयातीच्या परिस्थितीत, पैशामध्ये आणि रोखतेमध्येही प्रचंड वाढ झाली असती. दुसरे असे की, जागतिक स्तरावरील व्याजाचे दर वाढत आहेत आणि केंद्र व राज्य सरकारेही खुल्या बाजारातून मोठ्या प्रमाणात कर्जे उचलण्याची शक्यता आहे. या सगळ्या घटनांचा देशांतर्गत व्याजाच्या दरावर साहजिकच मोठा दबाव पडतो आणि ते वाढायला लागतात. असे असूनही रिझर्व्ह बँकेच्या धारणेनुसार देशात भरपूर रोखता आहे आणि भविष्यकाळात भाववाढीच्या दरात वाढ होण्याची अपेक्षा आहे. या दोन्ही घटकांवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. याकरिता रिझर्व्ह बँकेने यंदाच्या पैसाविषयक धोरणात रिव्हर्स रेपो रेट (Reverse Repo Rate) मध्ये १/४ टक्क्याने वाढ केल्याचे जाहीर केले. रिव्हर्स रेपो रेटमधील बदल आणि अर्थव्यवस्थेतील रोखता यांचा परस्पर नेमका काय संबंध आहे, हे समजावून घेतल्याखेरीज रिझर्व्ह बँकेने हे पाऊल का उचलले असावे याचा उलगडा होणार नाही.

रिझर्व्ह बँक, व्यापारी बँकांबरोबर परत खरेदीच्या करारान्वये सरकारी कर्जरोख्यांची अल्पकालासाठी खरेदी-विक्री करते. अशा व्यवहारांना रिपर्चेस ॲग्रिमेन्ट अथवा रेपोचे व्यवहार असे म्हणतात.बाजारपेठेतील परिस्थितीच्या तुलनेत व्यापारी बँकांकडे रोखतेचा

(लिक्विडिटी)तुटवडा असेल तर बँका आपल्याजवळील सरकारी रोखे परत खरेदीच्या कराराने रिझर्व्ह बँकेकडे ठेवून पैसा उभा करतात. अल्पमुदतीसाठी हा असा पैसा बँका ज्या व्याजदराने उचलतात त्यास रेपो रेट असे म्हणतात. रिझर्व्ह बँकही आपल्याजवळील सरकारी कर्जरोखे परत खरेदीच्या कराराने व्यापारी बँकांकडे ठेवून त्यांच्याकडून अल्पमुदतीसाठी पैसा घेत असते.रिझर्व्ह बँक ज्या व्याजदराने असा पैसा व्यापारी बँकांकडून उचलते त्या व्याजदरास रिव्हर्स रेपो रेट असे म्हणतात.

रेपो व्यवहारांद्वारे रिझर्व्ह बँक व व्यापारी बँकांदरम्यान सरकारी कर्जरोख्यांच्या खरेदी -विक्रीचे हे जे व्यवहार होतात त्याचा थेट परिणाम बाजारातील रोखतेच्या आकारमानावर होत असतो. परत खरेदीच्या कराराने व्यापारी बँका आपल्याजवळील कर्जरोखे रिझर्व्ह बँकेकडे ठेवून रेपो रेटने पैसा घेतात त्या वेळी अर्थव्यवहारांतील रोखतेमध्ये भर पडते. याच्याबरोबर उलट, रिझर्व्ह बँक आपल्याजवळील कर्जरोखे व्यापारी बँकांकडे ठेवून रिव्हर्स रेपो रेटने जेव्हा अल्पमुदतीसाठी पैसा उचलते, तेव्हा बँकांकडील रोखतेच्या मात्रेत किंवा रोखतेत घट होते. अशा पद्धतीने रिझर्व्ह बँक ही बँकांकडील रोखतेचे समायोजन करीत असते. या प्रक्रियेस रोखता समायोजन सुविधा (Liquidity Adjustment Facility) असे म्हणतात.

रिझर्व्ह बँकेने जाहीर केलेल्या रिव्हर्स रेपो रेटला किती पैसा कर्जरूपाने पुरविण्याची आपली तयारी आहे, याचे आपापले देकार (bids) बँका दर दिवशी रेपोच्या लिलावात प्रकट करतात. हा रिव्हर्स रेपो रेट आणि रोखतेची अल्पकालीन गरज भागविण्यासाठी व्यापारी बँका परस्परांकडून ज्या व्याजदराने कर्जे घेतात तो कॉल मनी रेट यांचा परस्पर संबंध आहे. व्यापारी बँकांनी प्रकट केलेले सर्वच्या सर्व देकार स्वीकारण्याची रिझर्व्ह बँकेची तयारी असेल तर रिव्हर्स रेपो रेट हा अल्पमुदतीच्या व्याजदराची (कॉल मनी रेट) किमान पातळी निश्चित करतो. एरवी, कॉल मनी रेट हा रिव्हर्स रेपो रेटपेक्षा खाली जाऊ शकतो. त्याचप्रमाणे, व्यापारी बँका आपल्याजवळील कर्जरोखे रिझर्व्ह बँकेकडे ठेवून रेपो रेटने अल्पमुदतीसाठी कर्ज उचलतात तेव्हा अल्पमुदतीसाठी बँकांना हवा तेवढा पैसा कर्जरूपाने देण्याची रिझर्व्ह बँकेची तयारी असेल तर तो रेपो रेट हा कॉल मनी रेटची कमाल पातळी निश्चित करतो. एरवी, कॉल मनी रेट हा रिव्हर्स रेपो रेटपेक्षा वर जाऊ शकतो.

रिझर्व्ह बँकेने रिव्हर्स रेपो रेटमधील वाढीची घोषणा केल्यानंतर लगेच कॉल रेट ४.६० टक्के ते ४.८० टक्के या दोन टोकांच्या बाहेर गेला नसला तरी,

वेगवेगळ्या मुदतींच्या सरकारी रोख्यांवरील दरही वाढले:- ९१ दिवसांच्या सरकारी हुंड्यांचे (Treasury bills) दर ४.९६ टक्क्यांवरून ५.२२ टक्क्यांपर्यंत वाढले; ३६४ दिवसांच्या सरकारी हुंड्यांचे दर ५.४० टक्क्यांवरून ५.५५ टक्क्यांपर्यंत वाढले, १० वर्षे मुदत असणाऱ्या भारत सरकारच्या रोख्यांचे दर ७.१० टक्क्यांवरून ७.२१ टक्क्यांपर्यंत वाढले आणि भारत सरकारच्या (२०१७ साली मुदत पूर्ण होणाऱ्या) रोख्यांचे दर ०.१३ टक्क्यांनी वाढून ७.५४ टक्के झाले. रिझर्व्ह बँकेचा असा दावा आहे की रिव्हर्स रेपो रेट वाढविला म्हणजे हे दर वाढलेच पाहिजेत, असे काही नाही. परंतु हा खरे तर अपेक्षित परिणामच म्हणायला हवा; आणि यावरून हेच स्पष्ट होते की व्याज दरांच्या पट्ट्यातील (spectrum) अगदी अल्प मुदतीचे व्याज दर बदलून वेगवेगळ्या मुदतींच्या व्याज दरांचा पट्टाच्या पट्टा रिझर्व्ह बँक आपल्या रोखता समायोजन सुविधेचा वापर करून प्रभावित करू शकते. व्यापारी बँकांना मात्र त्यांचे व्याज दर बदलण्यास थोडा विलंब लागतो.

६) वित्तीय स्थैर्य : पैशाच्या संदर्भातील धोरणाचे दोन मुख्य उद्देश सर्वांना माहितच आहेत. एक, किंमत पातळीचे स्थैर्य राखणे आणि दुसरा आर्थिक वाढीसाठी आवश्यक असणारा पैसा उपलब्ध करून देणे. आता यात तिसरे, महत्त्वाचे, उद्दिष्ट समाविष्ट करायला हवे आणि ते म्हणजे वित्तीय स्थैर्य राखणे.

गेल्या काही वर्षांमध्ये देशोदेशींचे वित्तीय बाजार एकमेकांशी जोडले गेले आहेत. आंतरराष्ट्रीय पातळीवर होणारे भांडवल प्रवाह व्यापक बनले असून त्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर चढउतार होत असतात. तसेच विनिमय दरांमध्येदेखील बदल होत असतात. या सर्व घटनांमुळे रोखतेचे अल्पकालीन व्यवस्थापन करण्यावर भर देणे क्रमप्राप्त झाले आहे. अर्थव्यवस्थेतील रोखतेचा दैनंदिन अदमास बांधणे, या रोखतेतील दैनंदिन बदलांचा वेध घेत राहणे, आवश्यकतेप्रमाणे त्या रोखतेत कमी-अधिक बदल करीत राहणे, हे आता रिझर्व्ह बँकेच्या धोरणाचे आधारभूत पैलू बनले आहेत. या गोष्टी आता पूर्वीपेक्षा आधिक आवश्यक होऊन बसल्या आहेत आणि म्हणून आजकाल अल्पकालीन व्याज दर आणि या दरांबाबतचे रिझर्व्ह बँकेचे धोरण यांना अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. खरे तर, रिझर्व्ह बँकेच्या धोरणाचा तो आता केंद्र-बिंदूच झाला आहे. त्यामुळे, रोखता समायोजन सुविधेद्वारे अल्प मुदतीच्या व्याज दरात बदल घडवून आणून वेगवेगळ्या मुदतींसाठी असणाऱ्या व्याज-दरांवर प्रभाव पाडण्याची रिझर्व्ह बँकेची जी क्षमता आहे, तिचे महत्त्व लक्षात घेणे आता जरूरीचे ठरते आहे.

याच कारणासाठी कॉल मनी मार्केट हे केवळ व्यापारी बँकांपुरते मर्यादित करण्याचा रिझर्व्ह बँकेचा प्रयत्न आहे. त्याचप्रमाणे अल्पमुदतीच्या कर्जासाठी व्यापारी बँका तर, दीर्घमुदतीच्या कर्जांसाठी विकास बँका असे बँकांचे वर्गीकरण व्यवहारात न ठेवता सर्वच बँका सर्वलक्ष्यी होणे (universal banking) हे रिझर्व्ह बँकेला आवश्यक वाटते.

तसेच, ज्या बाजारात इतर वित्तीय संस्था भाग घेऊ शकतील, पण रिझर्व्ह बँक मात्र सहभागी होणार नाही असा म्हणजे रिझर्व्ह बँकविरहित रेपो बाजार विकसित करणे, पैसाविषयक धोरण आणि कर्ज व्यवस्थापनाबाबतचे धोरण यांची फारकत करणे, या गोष्टी आता रिझर्व्ह बँकेच्या दृष्टीने महत्त्वाच्या झाल्या आहेत. या अशा संस्थात्मक बदलांमुळे, रिझर्व्ह बँकेच्या, निव्वळ अल्पकालीन रोखता व्यवस्थापन धोरणांचे लगेच होणारे परिणाम आणि त्यामुळे घडून येणाऱ्या इतर वित्तीय संस्थांच्या रोखता समायोजनाचे परिणाम, यांच्या दरम्यान असणारी सीमारेषा अधिक स्पष्ट होईल. या संस्थात्मक बदलांवर सध्या होत असलेल्या चर्चेपेक्षा अधिक व्यापक आणि अर्थपूर्ण चर्चा होणे आवश्यक आहे. विशेषतः, या बदलांचें मुदत कर्जे देणाऱ्या संस्थांच्या कार्यावर तसेच उद्योग व्यवसायांना गुंतवणुकीसाठी लागणाऱ्या दीर्घ मुदतीच्या कर्ज पुरवठ्यावर काय परिणाम होण्याची शक्यता आहे, याबाबतीत संक्रमणकालात निर्माण होणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी काय उपाययोजना आवश्यक आहेत, त्याचे परीक्षणही करणे गरजेचे आहे.

बँकांना त्यांच्या व्यवसायातील तसेच कर्ज व गुंतवणुकीतील जोखिमा आणि त्या जोखिमांसंदर्भातील बँकांनी केलेले नियोजन या गोष्टी लक्षात घेऊन आवश्यक तेवढेच भांडवल ठेवण्याची सुविधा बँकांना लागू करावयाच्या भांडवल पर्याप्ततेच्या सुधारित प्रमाणकांद्वारे म्हणजेच बॅसेल -२ मुळे (Basel II) उपलब्ध होणार असल्यामुळे बँकिंग प्रणालीची (banking system) कार्यक्षमता व वित्तीय स्थिरता या दोन्ही बाबतीत सुधारणा होणे निश्चितच अपेक्षित आहे. परंतु ज्या बँका काहीशा मोठ्या आहेत, किंवा ज्या विदेशी व्यापार व्यवहारात भाग घेतात त्यांना बॅसेल -२ मधील अधिक लाभदायक निकष वापरता येतील; तर, उलट अशा बँकांच्या तुलनेने, लहान बँकांना किंवा ज्यांचा आंतरराष्ट्रीय व्यापार-व्यवहारांशी फारसा संबंध आलेला नाही, अशा बँकांना सध्याच्या उच्च पातळीचे भांडवल पर्याप्तता प्रमाण

(पान ३४वर पाहावे)

संशोधन

# 'मोबाईल' मुळे जगाचे आरोग्य धोक्यात ?

विज्ञान आणि तंत्रज्ञान, विशेषतः, माहिती तंत्रज्ञान जसजसे प्रगत होत आहे तसतसे जगही प्रगत (?) होत आहे. तंत्रज्ञानाशी संबंधित असे 'प्रगतीशील बदल' बोली भाषेतही रूढ होत आहेत. भारतात असेच काहीसे घडते आहे. माहिती तंत्रज्ञानाशी संबंधित असलेले इंटरनेट आणि मोबाईल फोनचे जाळे, शहरी व ग्रामीण भागांत पसरत आहे आणि धीम्या गतीने का होईना, पण शहरी व ग्रामीण भागांतील नागरिक कुठेतरी याच्याशी 'जोडला' जात आहे. त्यामुळे 'बिईंग कनेक्टेड' असा एक शब्दप्रयोग, अलीकडे शहरांमध्ये रूढ झाला आहे. गेल्या दोन -तीन वर्षांपासून, ग्रामीण भागांत माहिती तंत्रज्ञान - म्हणजे संगणक व त्याद्वारे इंटरनेट आणि मोबाईल फोनचे जाळे पोचविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. आणि त्यामुळे ग्रामीण भागातही हा 'बिईंग कनेक्टेड' हा शब्दप्रयोग पोचू पाहात आहे; अल्प प्रमाणात तो पोचला आहे. या 'बिईंग कनेक्टेड'चे फायदे अनेक आहेत हे निर्विवाद. त्यातही इंटरनेटची यंत्रणा ही माणसांच्या शारीरिक आरोग्यावर अनिष्ट असे थेट परिणाम मोठ्या प्रमाणावर घडवून आणत नसावी. पण यातील मोबाईल फोनमुळे अनेकांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

अर्थात, मोबाईल सेवा पुरविणाऱ्या विविध कंपन्या, मोबाईलच्या सेवेमुळे आरोग्यावर दुष्परिणाम होतात वा होऊ शकतात, हे मान्य करण्यास तयार नाहीत. उलट, जास्तीत जास्त ग्राहकांना 'आपलेसे' कसे करून घेता येईल, यासाठी विविध जाहिरातींद्वारे व सवलतींद्वारे त्यांची मोर्चेबांधणी चालूच असते; आणि 'बिईंग कनेक्टेड'च्या मोहात पडून नागरिकही त्याला बळी पडत असतात.

या पार्श्वभूमीवर, मोबाईल फोनच्या वापरातून झालेल्या वा होऊ शकणाऱ्या आजारांसंबंधीचे जगभरातील अभ्यास - अहवाल आणि त्यासाठी न्यायालयांत दाखल करण्यात आलेले अर्ज हे यासंदर्भात बोलके आहेत. अनेक देशांमधील, विशेषतः अमेरिकेतील अनेक संशोधक मोबाईल फोनचे दुष्परिणाम नागरिकांसमोर आणताहेत.

**अनेक संशोधक ठामपणे असे म्हणताहेत की, मोबाईल फोन हे आरोग्याला, त्यातही मेंदूच्या आरोग्यासाठी फारच घातक आहेत.** हेन्री लाई हे वॉशिंग्टन विद्यापीठातंर्गत वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालयात प्राध्यापक आहेत. किरणोत्सर्ग (रेडिएशन) या विषयातील ते तज्ज्ञ. १९९९ मध्ये त्यांना असे आढळले की, अगदी कमी पातळीवरील किरणोत्सर्गामुळे मेंदूतील डी.एन.ए. या विशिष्ट प्रथिनांचे रेणू विघटित होतात आणि त्यामुळे अल्झायमर्स, पार्किन्सन्स किंवा कॅन्सर यांसारखे आजार होऊ शकतात.

स्वीडनमधील एका विद्यापीठाशी संबंधित असलेल्या रुग्णालयाने या विषयावरील अभ्यास 'एन्व्हायर्नमेंट हेल्थ सायन्सेस'मध्ये (फेब्रुवारी २००३) प्रसिद्ध केला. हा अभ्यास लाई यांच्या निष्कर्षांना पाठिंबा देतो. या अभ्यासात १२ ते २६ आठवडे हे वय असलेल्या उंदरांवर किरणोत्सर्गाच्या परिणामांचा अभ्यास करण्यात आला. कारण, या वयाच्या उंदरांच्या मेंदूच्या पेशींची वाढ ही, पौगंडावस्थेतील मुलामुलींच्या मेंदूतील पेशींच्या वाढीसारखीच असते. दोन तास सतत वापरल्या जात असणाऱ्या मोबाईल फोनमधून जेवढे रेडिएशन होते तेवढेच रेडिएशन या उंदरांच्या मेंदूला सतत ५० दिवस देण्यात आले. मग ५० दिवसांनंतर त्याच्या मेंदूतील काही विशिष्ट भागांची तपासणी करण्यात आली. तेव्हा मेंदूच्या कार्याचे मूलभूत जाळे असणाऱ्या मज्जापेशींची बरीच हानी झाल्याचे आढळून आले.

वॉशिंग्टन विद्यापीठातील संशोधक विलियम यांनी रेडिएशनचा पाच वर्षे सतत अभ्यास केला (१९९५). त्यांच्या अभ्यासातून असे आढळले की, कमी पातळीवरील रेडिएशनचा प्रयोग केलेले बहुतांश प्राणी हे ब्रेन ट्यूमरने वा शरीरातील आरोग्यरक्षक यंत्रणा (इम्युन सिस्टिम) संपुष्टात येऊन मृत्युमुखी पडले.

जर्मनीतील एसान विद्यापीठात उंदरांवर करण्यात आलेल्या प्रयोगातून असे दिसून आले की, मोबाईल फोनचे रेडिएशन्स डोळ्यांतील रेटिना या भागापर्यंत पोचतात. त्यामुळे रेटिनाच्या व आयरिस या भागाला नुकसान पोचून डोळ्यांचा कॅन्सर होण्याची शक्यता वाढते.

इटलीमधील नॅशनल रिसर्च कौन्सिलचे फिओरेंझो मॅरिनेली यांना असे आढळले की मोबाईल फोनच्या रेडिएशनमुळे ल्युकेमियाच्या पेशींचे विभाजन अधिक वेगाने होते. झोपायच्या आधी मोबाईल फोन जास्त वापरला तर झोपेत व्यत्यय येऊशकतो. स्वीत्झर्लंडमधील झुरिच विद्यापीठातील ॲलेक्झांडर बॉर्बले आणि पीटर ॲकरमॅन यांनी

१६ व्यक्तींना झोपायच्या तीस मिनिटे आधी रेडिएशनच्या (मोबाईल फोनमधून जेवढे रेडिएशन होते तेवढ्याच रेडिएशनच्या) संपर्कात ठेवले. तेव्हा त्यांच्या मेंदूच्या कार्यात वाढ झाली होती आणि ती सुमारे ५० मिनिटे कायम होती.

स्पॅनिश न्युरोडायग्नोस्टिक रिसर्च इन्स्टिट्यूटमधील संशोधकांचे म्हणणे आहे की, मोबाईल फोनवर केवळ दोन मिनिटांचा एक कॉल झाला तरी त्यामुळे मेंदूतील ब्रेन ब्लड बॅरियर ही घातक पदार्थांना रोखणारी यंत्रणा खुली होते. त्यामुळे रक्तातील घातक पदार्थ हे मेंदूपर्यंत पोचू शकण्याचा मार्ग मोकळा होतो आणि मज्जापेशींचे नुकसान होते. लहान मुले व मोठी माणसे सर्वांसाठीच हा परिणाम सारखाच घडून येतो. लहान मुलांच्या मेंदूत संदेशांच्या देवाण -घेवाणीचे जे नैसर्गिक विद्युतकार्य चालू असते त्यात सुमारे एका तासापर्यंत व्यत्यय येत राहतो, असेही यावेळी आढळले.

कॅथॉलिक युनिव्हर्सिटी ऑफ अमेरिका यांनी कोंबड्यांच्या दहा हजार अंडयांतील पिलांना (चिकन एम्ब्रियो - अंडस्थ गर्भ - याचे मानवी गर्भाशी साधर्म्य असते ) रेडिएशनच्या संपर्कात ठेवले. अंड्यांतून बाहेर आल्यानंतर त्यांच्यामध्ये अनेक विकृती आढळल्या. रेडिएशनमुळे पेशींमधील जी ताण कमी करणारी प्रथिने (स्ट्रेस प्रोटीन्स) असतात ती कार्यरत होतात. शरीराचे झालेले नुकसान ती भरून काढत असतात; पण, तीच जर जास्त प्रमाणात कार्य करू लागली तर ते घातकही ठरू शकते. हा परिणाम कमरेच्या पट्टयाला मोबाईल बांधून फिरणाऱ्यांनी लक्षात घ्यावा असा आहे. गर्भवती स्त्रियांनीही मोबाईलच्या वापराचा पुनर्विचार केला पाहिजे. कारण अशा प्रकारे पोटाजवळ मोबाईल अडकविणे हे, गर्भाच्या वाढीवर विपरित परिणाम घडवून आणणारे ठरू शकते.

मोबाईलचे दुष्परिणाम हे अनेकांनी न्यायसंस्थेच्या निदर्शनास आणले आहेत. मोबाईल सेवा देणाऱ्या कंपन्या ग्राहकांना संरक्षण देण्यासाठी उपाययोजना करीत नाहीत, त्यांचे हित जपत नाहीत असे अनेक अर्जदारांनी म्हटले आहे. न्यायालयाने अशा खटल्यांमध्ये ग्राहकांचे हितरक्षण करण्याचे आदेशही दिले आहेत. उदाहरणार्थ, गेल्या वर्षी, जूनमध्ये, मुंबई नागरी न्यायालयाने भारती सेल्यूलर लिमिटेडला नागरी वस्तीमधील एका इमारतीवर असणारा या कंपनीचा अँन्टेना काढण्याचा आदेश दिला होता. यासंबंधी १८ ऑक्टोबर २००३ रोजी, या इमारतीच्या अकराव्या मजल्यावर राहणाऱ्या नागरिकाने अशी तक्रार केली होती की, ही सेवा पुरविणाऱ्या या कंपनीच्या अँन्टेनामुळे आपल्या कुटुंबाचे आरोग्य धोक्यात आले आहे. या लहरींमुळे झोपेसंबंधीचे त्रास सुरू

झाल्याचे त्यांनी तक्रारीत नमूद केले होते. अमेरिकेत १९९२ मध्ये यासंबंधीचा पहिला खटला दाखल करण्यात आला होता. मोबाईल फोनच्या रेडिएशनमुळे आपल्या पत्नीला ब्रेन कॅन्सर झाला, असे डेव्हिड रेनार्ड यांचे म्हणणे होते. पण १९९५ मध्ये पुरेशा वैज्ञानिक पुराव्याअभावी हा खटला रद्दबातल करण्यात आला होता. आणि असे अनेक खटले नंतरच्या काळातही रद्दबातल ठरविण्यात आले होते. मात्र, न्यायसंस्थेने या तक्रारींचा विचार गांभिर्याने करावा, असे नेहमीच म्हटले होते.

## कंपन्यांची भूमिका

मोबाईल सेवेचे जाळे दिन -प्रतिदिन पसरविणाऱ्या अनेक कंपन्या मोबाईल फोन हा सुरक्षित असल्याची भूमिका घेत असतात. कारण, कोणताही आजार हा एका विशिष्ट बाबीमुळे होतो, असे सिद्ध करणे हे फारच अवघड ठरते. व्यक्ती 'मोबाईल' असणे आणि व्यक्तींजवळ 'मोबाईल' असणे (म्हणजे 'बिईंग कनेक्टेड') या दोन्ही बाबी आता बदलत्या जीवनशैलीचा अविभाज्य भाग मानल्या जातात. त्यामुळे या कंपन्या मोबाईलच्या तंत्रज्ञानात सतत काही ना काही बदलही करीत राहतात. नवीन मॉडेल्समध्ये रेडिएशनचा त्रास होणार नाही, अशा काही सुधारणा करण्याचा प्रयत्न काही कंपन्यांनी केला आहे. असे काही पेटंटही कंपन्यांनी घेतले आहेत. नोकिया ही त्यातीलच एक. त्यांनी शिल्ड लेयरचे पेटंट घेतले आहे. आणि असे पेटंट हे, पेटंट कार्यालयात सात वर्षांपासून प्रतिक्षेत होते. म्हणजे याचा अर्थ, कंपन्यांना यातील धोके आधीपासूनच माहिती होते, असाही होतो.

यासंबंधी काही तज्ज्ञांचे मत असे आहे की, धूम्रपान व कॅन्सर यांच्या परस्परसंबंधांबाबत जसा वाद जसा झाला तसेच काहीसे मोबाईलच्याबाबत घडते आहे. त्यामुळे सिगरेटच्या पाकिटावर, 'सिगरेट पिणे आरोग्याला घातक आहे,' असे वाक्य छापले जाते, तशाच प्रकारचे वाक्य मोबाईल उत्पादक कंपन्यांनी छापावे, असाही एक मार्ग सुचविण्यात आला आहे. पण असाही एक खटला ब्रिटनमध्ये रॉजर कॉगहिल हे न्यायालयात हरले आहेत.

अशा परिस्थितीत आता संशोधकांना आशा आहे ती फक्त मोबाईल वापरणाऱ्या ग्राहकांकडून. त्यांनीच सारासार विचार करून मोबाईल वापरावा, असे ते सूचित करतात.

*(संदर्भ - इंटरनेट, डाऊन टू अर्थ - १५ मे २००५, अर्थबोधपत्रिका एप्रिल २००३,)*

✿✿

सामाजिक

# युरोपः बहुविध संस्कृती व इस्लाम

"या देशातील विविध संस्कृतींनी नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे." शाळांच्या क्रमिक पुस्तकाच्या पहिल्या पानावरील या वाक्याचा आशय आज जगात भारतासाठी नव्हे, तर युरोपमधील घडामोडींच्या संदर्भात महत्त्वाचा ठरतो आहे. बहुविध संस्कृती असलेला समाज सामंजस्याने एकत्र नांदणे, हे सुसंस्कृत व वैचारिकदृष्ट्या प्रगत समाजाचे लक्षण मानले गेले आहे. तसेच सहकाराचे मूल्यही त्यातून अभिव्यक्त झालेले आहे. या संकल्पनेला, मूल्याला महत्त्व देणाऱ्या देशांमधील एक देश आहे नेदरलँड्स्. आतापर्यंत लोकशाही मूल्यांना महत्त्व देऊन व्यक्तिस्वातंत्र्य आणि त्या अनुषंगाने कधीकधी टोकाचा विक्षिप्तपणाही डचांच्या या देशाने मान्य केला आहे. मात्र, अलीकडे तेथे घडलेल्या काही घटनांवरून बहुविध संस्कृती असलेला समाज, ही संकल्पना मुळातच जुनी (पुराणमतवादी) असल्याचे मत तेथील काही नागरिक व्यक्त करीत आहेत. परिणामी, या देशात हा विषय राजकारणाच्या मुख्य प्रवाहात वादग्रस्त चर्चेचा ठरतो आहे. (या देशात सुमारे सात लाख स्थलांतरित मुस्लिम समाज आहे.)

हा विषय येथे चर्चेला येण्याचे मूळ, एका तात्कालिक घटनेत आहे; तसेच ते काही जुन्या बाबींमध्येही आहे. इस्लामवर टीका करणारे येथील एक नागरिक वॅन गोग यांची अलीकडेच झालेली हत्या, ही ती तात्कालिक घटना होय. गोग यांची हत्या मोहम्मद बोयेरी याने केली असावी, आणि त्याला आंतरराष्ट्रीय पातळीवरील दहशतवाद्यांचा पाठिंबा असावा असा कयास आहे. मोहम्मद बोयेरीच्या गटाशी संबंधित बारा संशयितांना अलीकडे पकडण्यात आले व आणखी काही राजकीय हत्या घडवून आणण्याच्या प्रयत्नात ते आहेत, असा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. यातील काही व्यक्तींची नाळ मोरोक्कोशी जोडलेली आहे; तर, इस्लाम स्वीकारणारे दोन डच - अमेरिकन नागरिकही त्यांच्यात आहेत. चौकशीअंती असे आढळले की, बोयेरीची शालेय शिक्षणातील प्रगती चांगली होती आणि सामाजिक कार्यातही त्याचा सहभाग होता. कौटुंबिक व व्यावसायिक अडचणींमुळे तो दहशतवादाकडे वळला असावा, असे म्हटले जाते.

## बहुविध संस्कृतीची संकल्पना पुराणमतवादी ?

या पार्श्वभूमीवर, इस्लामी मूलतत्त्ववाद व दहशतवाद आता या देशाला कवटाळतो आहे की काय, या विचाराने येथील राजकारण व जनजीवन चिंतित झाले आहे. इस्लामविषयक प्रश्न पाहता, बहुविध संस्कृतींना, श्रद्धांना व मूल्यांना सामावून घेण्यावर या देशाने जरा जास्तच भर दिला की काय, या दिशेकडे येथील समाजाचे विचार जाताहेत. म्हणून बहुविध संस्कृतींचा समाज ही संकल्पना पुराणमतवादी आहे, असे येथे एका गटाकडून म्हटले जात आहे. या गटातील नागरिकांना असे वाटते की, स्थलांतर केल्याने व्यक्ती बदलतात, बदलू शकतात, ही महत्त्वाची बाब या संकल्पनेकरवी नाकारली जाते, म्हणून ती कालोचित ठरत नाही. असे मत व्यक्त करणाऱ्यांमधील एक विचारवंत आहेत पॉल चेफर हे बोहेमियन असलेले ॲमस्टरडॅमस्थित ज्येष्ठ नागरिक व पत्रकार. कायद्याचे राज्य प्रस्थापित व्हावे आणि इस्लामी दहशतवादाला चोख प्रत्युत्तर द्यावे, असे त्यांचे स्पष्ट मत आहे. व्यक्तिस्वातंत्र्य मान्य करणाऱ्या, खुल्या विचारप्रवाहात हिंदोळे घेणाऱ्या व कायद्याने नियंत्रित होणाऱ्या समाजात राहण्याची किंमत ही त्या समाजातील सर्वच घटकांनी मोजणे अपेक्षित आहे. त्यामुळे सर्व घटकांनी दुसऱ्याचे स्वातंत्र्य मान्य करणे, अगदी धर्मत्यागापर्यंतचे तीव्र मतभेदही लक्षात घेणे हे गरजेचे ठरते. नेदरलँड्स्मधील भावी पिढीलाही हा संदेश स्पष्टपणे पोचला पाहिजे असे पॉल चेफर व त्यांच्या मित्रांना वाटते. युरोपमधील काही देशांमध्ये नेदरलँड्स्मधील अशी भाषा, ही असहिष्णू गटात मोडू शकते, पण नेदरलँड्स् येथे ही राजकारणाच्या मुख्य प्रवाहाचा भाग ठरली आहे. चेफर हे फक्त आपल्या देशातील परिस्थितीबाबत मत व्यक्त करीत आहेत असे नव्हे; तर, इस्लामबाबत ब्रिटनमधील सरकारच्या एका निर्णयावरही त्यांनी टीका केली आहे. ब्रिटनमधील पोलिससेवेत नोकरीला असणाऱ्या मुस्लिम महिलांना मुस्लिम पद्धतीचा मोठा रुमाल (हिजब वा हेडस्कार्फ) डोक्याला बांधण्याची मुभा दिली गेली आहे. चेफर असे म्हणतात की, ही परवानगी देऊन ब्रिटनने मोठी चूक केली आहे; कारण, अशा सेवेतील 'युनिफॉर्म' हा शासनाची वा यंत्रणेची देशामधील सर्वच नागरिकांबाबतची तटस्थता दर्शवीत असतो.

दहशतवादाचा मुद्दा आणखी एका घटनेसंदर्भात उपस्थित केला जात आहे. तेथील संसदेमध्ये बॉंब असल्याची अफवा (मार्च २००५) उठणे व नागरिकांमध्ये भीती निर्माण होणे या बाबींचा संबंध एका जुन्या घटनेशी जोडला गेला आहे. या देशात आलेल्या स्थलांतरितांचे प्रश्न सुटावेत म्हणून डच सरकारने काही धोरणे जाहीर केली.

त्याद्वारे स्थलांतरितांसाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून देण्यात आला. यामुळे नाराज होऊन पिम फॉच्यून या समाजशास्त्रज्ञाने इस्लामच्या असहिष्णू भूमिकेवर टीका केली. त्यांचे विचार समाजात पसरू लागताच एका गटाकडून त्यांची हत्या करण्यात आली (२००२). समाजातील अनेक घटकांनी अशा सामाजिक व सांस्कृतिक प्रश्नांवर दुःख व काळजी व्यक्त केल्याने डच -इस्लाम यांच्या संदर्भातील संशोधनपर अनेक अभ्यास, अलीकडच्या काळात समाजासमोर आले. या अभ्यासांमधील निष्कर्ष एकीकडे दिलासा देणारे तर दुसरीकडे त्रासदायक ठरू शकणारे आहेत, असे काहींना वाटते.

## 'डच -मुस्लिम' जुने आणि नवे

हे अभ्यास असे सांगतात की, नेदरलँड्स् येथील मुस्लिम नागरिकांची संख्या सुमारे सात लाखांच्या घरात असून ती दोन मोठ्या गटांत विभागली गेली आहे. सुमारे साडे -तीन लाखांवर नागरिकांचा मूळ देश टर्की (तुर्कस्तान) आहे आणि तीन लाखांवर नागरिकांचे मूळ मोरोक्को या देशात आहे. दोन्ही गटांमध्ये काही बाबतीत साधर्म्य आहे.

### कुराणावर चर्चा होणे आवश्यक - अयान हिरसी अली

*"इस्लामचे संस्थापक हे त्या काळाच्या मानाने आधुनिक असले तरी त्यांचे शब्द आजही तंतोतंत पाळले गेले पाहिजेत असे नाही. इस्लाममध्ये सुधारणा घडवून आणणे हा एक भाग आहेच. पण कुराणातील प्रत्येक शब्द अतिपवित्र आहे, असे मानले तर त्यात सुधारणा कशा होणार, असे करणे म्हणजे एखादी खोली बंद करणे व (साधनांशिवाय) ती सजवा, असे म्हणणे होय," असे मत मांडले आहे अयान हिरसी अली या नेदरलँड्स् मध्ये स्थलांतरित झालेल्या तरुण मुस्लिम स्त्रीने. इस्लामचे टीकाकार असलेले व अलीकडेच हत्या झालेले वॅन गोग यांची ही मैत्रीण. मूळची सोमालियाची. तिचे आई - वडिल सौदी अरेबियाचे. नेदरलँड्स्मध्ये, वॅन गोग यांच्या बरोबर तिने एक चित्रपट तयार केला होता. त्यात कुराणातील काही पंक्तींवर चर्चा घडवून आणण्याच्या उद्दिष्टाने त्यांनी त्या पंक्तींना पार्श्वभूमी पुरविली ती स्त्री देहाच्या अनुचित प्रदर्शनाची. पण झाले भलतेच. ही कृती म्हणजे ईश्वराची निंदा होय, असा अर्थ घेतला गेला आणि या दोघांवर टीकेची झोड उठली (गोग यांची हत्या यातूनही झाली असावी, असेही म्हटले गेले आहे). महत्त्वाचे म्हणजे काही डच - मुस्लिम स्त्रियाही अयानच्या विरोधात गेल्या असून त्यांनी तिला धमक्या दिल्या आहेत. या सर्व प्रकरणात अयान अली सध्या सुरक्षा रक्षकांच्या संरक्षणात आहे.*

दोन्ही देशांमधील ज्या विशिष्ट भागांत गरिबी आहे, तेथून बहुतांश नागरिक स्थलांतर करून नेदरलँड्स्मध्ये आलेले आहेत. दोन्ही गटांमधील तरूण पिढी लग्न करताना मायदेशांमधील मुलींना प्राधान्य देतात. त्यामुळे या देशाशी त्यांची नाळ जुळणे हे आणखी एका पिढीच्या अंतराने पुढे ढकलले जाते. मोरोक्कोशी संबंधित युवकांमध्ये छोट्या छोट्या गुन्ह्यांचे प्रमाण जास्त आढळते. तुर्कस्तानमधील युवक आपला एक वेगळा समाजगट करून त्या अंतर्गत व्यापार व तत्सम व्यवहार करतात. डच - मुस्लिमांची पहिली पिढी जेवढी धार्मिक होती, त्या तुलनेत दुसरी पिढी थोडी कमी धार्मिक आहे. एका सर्वेक्षणानुसार असे आढळले की, तुर्कस्तानशी संबंधित असलेले दुसऱ्या पिढीचे ३७ टक्के नागरिक आठवड्यातून एकदा मशिदीत जातात; तर, पहिल्या पिढीतील नागरिकांचे हे प्रमाण ४७ टक्के इतके होते. मोरोक्कोमधील दुसऱ्या पिढीत हे प्रमाण ३२ टक्के आहे; तर, पहिल्या पिढीत ते ४६ टक्के एवढे होते.

दोन्ही गटांमधील दोन -तृतीयांश नागरिकांचे मत आपल्या मुलींनी मुस्लिमेतर युवकाशी विवाह करू नये, असे आहे. या मुद्याबाबत मात्र पिढीप्रमाणे विचार बदललेले नाहीत. तुर्कस्तानातील २९ टक्के मुस्लिमांना व मोरोक्कोतील ३२ टक्के मुस्लिमांना असे वाटते की इस्लामला राजकारणात काही स्थान असावे. पण राजकारणात इस्लामचा निर्णय अंतिम असावा असे तुर्कस्तान व मोरोक्को या देशांतील अनुक्रमे फक्त दोन ते तीन टक्के नागरिकांनाच वाटते.

दरम्यान, डच गुप्तचर खात्याने (AIVD) म्हटले आहे की, ९५ टक्के डच मुस्लिम हे मवाळ गटात मोडतात. ही दिलासा देणारी बाब असली तरी त्यातून आणखी एक अर्थ ध्वनित होतो. तो असा की, सुमारे ५० हजार नागरिक जहाल गटात मोडणारे आहेत व ते भविष्यात अतिरेकीसमर्थक ठरू शकतात. एक वस्तुस्थिती अशीही आढळली आहे की, हिंसाचार घडवून आणू शकणारे २०० अतिरेकी सध्या नेदरलँड्स् मध्ये आहेत व त्यांना सुमारे हजार -बाराशे लोकांचा पाठिंबा मिळत असावा, असा प्राथमिक अंदाज आहे.

डच समाजाची मूल्ये व व्यवस्था यांची आजपर्यंतची वाटचाल पाहता या समाजाला हा प्रश्न सोडवून पुढे जाताच येणार नाही, असेही नाही. पण या समाजाची सध्याची वाटचाल ही शांतता व स्थैर्याकडून, काही नाट्यपूर्ण सामाजिक बदलांकडे होण्याची चिन्हे दिसताहेत, असे मत व्यक्त करण्यात आले आहे. आणखी एक मतप्रवाह असा आहे की, या देशाचे सामाजिक -सांस्कृतिक प्रश्न हे काही राजकीय

धोरणांमुळे कटुतेकडे वळले असावेत. कारण सरकारच्या काही धोरणांमुळे देशातील स्थलांतरितांना कोणत्याही प्रकारचे काम न करताही सामाजिक सुरक्षेच्या नावाखाली उदरनिर्वाह करता येत होता. यामुळे अगदी अलीकडच्या काळापर्यंत, मोरोक्कोवंशीयांमधील ४० वर्षांवरील नागरिकांपैकी निम्मे नागरिक हे उपजीविकेसाठी विशिष्ट असे काम करीत नव्हते. मात्र, आता सरकारने याबाबतीत कडक नियम केले आहेत. जी व्यक्ती जे काम करण्यासाठी सर्वार्थाने योग्य असेल, त्या व्यक्तीला ते काम नाकारणे शक्य होणार नाही, अशा नियमांची अंमलबजावणी करण्यास सुरुवात झाली आहे.

**राजकीय पटलावर....**

तरी तेथे एक गट अजूनही याच विचारधारेचा आहे की, सार्वजनिक निधी हा विविध वंशीय, विविध धर्मीय नागरिकांना एकत्र आणण्यासाठी खर्च केला पाहिजे. असे म्हणणाऱ्यांमध्ये ॲमस्टरडॅमचे महापौर जॉब कोहेन यांचा समावेश आहे. स्थलांतरित व देशी नागरिक या दोघांनीही पुढाकार घेऊन एकतेसाठी विशेष प्रयत्न केले पाहिजेत, असे त्यांना वाटते. एखाद्या महापौराचे असे बोलणे हे ब्रिटनमध्ये 'राजकीय बोलणे' मानले जाऊ शकते. मात्र, नेदरलँड्स्मध्ये महापौरांनी असे बोलणे याचा अर्थ, त्यांना यासंबंधी मनापासून वाईट वाटले असेल, असा घेतला जातो. कोहेन असेही म्हणतात की, एखादी हत्या होणे व त्या घटनेपुरते वादळ निर्माण होणे, एवढ्यावर हा प्रश्न सुटणारा नाही. त्यामुळे सामाजिक स्थैर्याच्या दृष्टीने प्रयत्न व्हायला हवे आहेत.

येथील आणखी काही राजकीय नेतेही या सर्व प्रकाराकडे गांभिर्याने बघत आहेत. या नेत्यांनी, युरोपीय युनियनच्या चर्चांमध्ये, विविध परंपरा, संस्कृती व स्थलांतरितांनी त्यात सामावून जाणे यासंबंधीच्या विविध बाजूंचा ऊहापोह घडवून आणला. त्यातून फलित असे निघाले की, युरोपीय समाजासाठी 'समान मूलभूत तत्त्वे वा मूल्ये' असावीत, याच्या बाजूने सर्वांनी कौल दिला. हाच विषय पुढे नेण्यासाठी नेदरलँड्स्मध्ये सरकारने स्वयंसेवी संस्था आणि धार्मिक संस्था यांच्या मदतीने भिन्नधर्मीय,भिन्नवंशीय नागरिकांमध्ये सामंजस्य व सलोखा प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न चालू केले आहेत.

दहशतवाद आटोक्यात आणून तो मूळापासून संपावा यासाठी प्रयत्न करणे आणि बहुविध संस्कृतीही जपणे, अशा दोन आघाड्यांवर नेदरलँड्स्चे सरकार सध्या लढत आहे. समान मूलभूत तत्त्वांच्या स्थापनेसाठी तिथे हीच वेळ योग्य ठरते आहे !

*(संदर्भ - द इकॉनॉमिस्ट, २ एप्रिल २००५)*

सामाजिक

# फ्रान्स : 'धर्मा'च्या मदतीने 'धर्मनिरपेक्षता' !

धर्म व शासन (राज्य) यांची कायद्याने फारकत करून धर्मनिरपेक्षतेकडे जाण्याचे पहिले पाऊल फ्रान्सने उचलले, त्या घटनेला यंदा २००५ साली शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. धर्मनिरपेक्ष फ्रान्समध्ये याचवर्षी आणखी एक महत्त्वाची घटना घडली आहे आणि ती चर्चेची ठरली आहे. ती म्हणजे ख्रिश्चन धर्मगुरू पोप यांचे निधन झाल्यानंतर फ्रान्समध्ये राष्ट्रीय दुखवटा व्यक्त करण्यात आला आणि त्यासाठी सरकारी इमारतींवरील ध्वज अर्ध्यावर उतरविण्यात आले.

या कृतीच्या विरोधी दिशेला जाणारी आणखी एक घटना गेल्या वर्षी फ्रान्समध्ये गाजली होती. फ्रान्समधील नागरिकांनी, सार्वजनिक ठिकाणी, विशेषत: शाळांमध्ये, आपापल्या धर्माचे प्रदर्शन करणारी कोणतीही चिन्हे (मुस्लिम स्त्रिया डोक्यावर बांधतात तो मोठा रुमाल -हिजब, ज्यू घालतात ती विशिष्ट टोपी वा ख्रिश्चन घालतात तो क्रॉस इ.) धारण करू नयेत, असा आदेश तत्कालीन पंतप्रधान जॅक शिराक यांनी काढला होता. मुस्लिम स्त्रियांच्या हिजबवरूनच हा प्रश्न उपस्थित झाला होता. या पार्श्वभूमीवर अलीकडे घडलेली एक घटनाही महत्त्वाची आहे. फ्रान्सच्या व एकूण युरोपीय सामाजिक व सांस्कृतिक वातावरणाला बाधा येऊ नये आणि सामाजिक तेढ निर्माण होऊ नये, असे विशेष प्रशिक्षण मुस्लिम धर्मगुरूंना देण्यास फ्रान्समध्ये सुरुवात झालेली आहे. खाजगी चर्चांमध्ये त्यांना 'मॉडर्न इमाम' असे संबोधले जात आहे. 'युरोपियन इन्स्टिट्यूट फॉर ह्युमन सायन्सेस' यांच्यातर्फे असा अभ्यासक्रम चालविण्यात येत आहे. राजकीय नेते, विचारवंत आणि कायदेविषयक यंत्रणा या सर्वांच्या मते असे प्रशिक्षण महत्त्वाचे मानले जात आहे.

या सर्व घटना तशा वेगवेगळ्या आहेत, पण त्यांचा केंद्रबिंदू 'बहुविध संस्कृती (धर्म) व इस्लाम' हा असावा, असे दिसते आहे. यासंबंधी विविध चर्चाही झडत आहेत आणि त्यातून एखाद्या कृतीबाबत कधी विरोधाचा तर कधी समर्थनाचा सूर समाजात पसरतो आहे. उदाहरणार्थ, फ्रान्सने जर धर्मनिरपेक्षता मान्य केली आहे, तर पोप यांच्या निधनानंतर राष्ट्रीय दुखवटा व्यक्त करणे, हे योग्य की अयोग्य, असा मुद्दा

उपस्थित झाला. वरील पार्श्वभूमीवर फ्रान्समध्ये धर्मयुद्धाची ठिणगी पडणार की काय, अशी भीती समाजवादी गटातील एकाने व्यक्त केली. दुसऱ्या राजकीय गटामधील काही व्यक्तींनी धर्मनिरपेक्ष शासनाने आध्यात्मिक विश्वास वा बांधिलकी आणि देशाचे राजकीय निर्णय हे वेगळे ठेवायला हवे, असे मत मांडले आहे.

या देशात ७० टक्के नागरिक धर्माला महत्त्व देणारे आहेत आणि त्यापैकी ९० टक्के ख्रिश्चन (कॅथॉलिक) आहेत. पण त्यांची ही धार्मिक - आध्यात्मिकता समाजजीवनात दिसून येते असे नाही. उदाहरणार्थ, यांतील फक्त १३ टक्के नागरिक नियमितपणे चर्चमध्ये जातात. शासनानेही धर्म व शासनव्यवस्था - कार्यालयीन कामकाज या दोन बाबी पूर्णपणे वेगळ्या ठेवल्या आहेत. त्यामुळे, अलीकडे शासनाने कॅथॉलिक चर्चकडे दाखविलेला झुकता कल (म्हणजे पोप यांच्या निधनानंतर दुखवटा व्यक्त करणे), ही लक्षवेधक घटना ठरली आहे. सत्ताधारी पक्षाच्या एका नेत्याने या घटनेला 'धर्मनिरपेक्ष मूलतत्त्ववाद' ('सेक्युलर फंडामेन्टलिझम') असे संबोधले आहे. तेव्हा, धर्मनिरपेक्ष फ्रान्समध्ये, 'धर्माचे समाजजीवनातील स्थान' हा विषय पुन्हा एकदा चर्चेत आहे.

असे असले तरी फ्रान्समधील समाजजीवनात व राजकारणात सध्या निर्माण झालेल्या ताणास ख्रिश्चन धर्म जबाबदार नाही; तर, इस्लाम धर्म जबाबदार आहे, असे अनेकांना वाटते. याचे एक मुख्य कारण म्हणजे, गेल्या वर्षी मुस्लिम स्त्रियांच्या हिजब बांधण्यावरून तेथे उठलेले वादळ आणि त्या अनुषंगाने फ्रान्समध्ये व युरोपमध्ये इतरत्रही इस्लामविषयक घडलेल्या आणखी काही घटना होय. फ्रान्समध्ये लाखो मुस्लिम नागरिक असून धर्माचा विचार करता त्यांचे पालकत्व अल्जिरिया व मोरोक्कोकडे जात होते. अलीकडे मात्र, फ्रान्सने त्याचा वेगळा विचार केला. 'धर्माच्या मदतीने धर्मनिरपेक्षते'कडे जाण्याचा एक वेगळा प्रयोग म्हणून फ्रेंच सरकारने, फ्रेंच मुस्लिमांच्या मदतीने काही पावले उचलली.

इस्लामला अधिकृतरीत्या काही विचार मांडण्याची परवानगी देण्याबाबतचे पहिले पाऊल फ्रान्समध्ये उचलले गेले ते २००३ मध्ये. तेव्हा, 'फ्रेंच कौन्सिल ऑफ मुस्लिम फेथ'ची (CFCM) स्थापना करण्यात आली. यामुळे मुस्लिमांचे चार गट एकत्र आले. त्यातील तीन गटांना परदेशांमधून सहकार्य मिळत होते. तर, एक गट 'युनियन ऑफ इस्लामिक ऑर्गनायझेशन्स ऑफ फ्रान्स' असा होता. 'फ्रेंच कौन्सिल ऑफ मुस्लिम फेथ'चे कार्य, मशिदींमधून होत असल्याने त्यांच्या कामाची विभागणीही धार्मिकतेच्या व श्रद्धेच्या पायावर होत गेली. फ्रान्समधील मुस्लिमांपैकी फक्त पाच

टक्के मुस्लिम नागरिक आठवड्यातून एकदा मशिदीत जातात, त्यामुळे ते यापासून दुरावले गेले; कारण, नियमितपणे मशिदीत न जाणाऱ्या या नागरिकांना आपले प्रतिनिधित्व यांत आहे असे जाणवले नाही. इस्लाममध्ये अधिक मोकळेपणा यावा असे वाटणाऱ्या आणि फ्रान्समधील मुक्त वातावरणात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या गटातील एक मुस्लिम महिला या कौन्सिलमध्ये होती. पण जेव्हा फ्रान्सच्या सरकारने मुस्लिम स्त्रियांच्या हिजब बांधण्याला अनुमती दिली नाही, तेव्हा त्याला पाठिंबा न देता, त्याच्या विरोधात या कौन्सिलने आपली भूमिका जाहीर केली. म्हणजे एका अर्थाने, या कौन्सिलने आपली भूमिका ही, धर्माच्या चौकटीत बसतील तेवढ्याच सुधारणा स्वीकारायच्या अशी असेल, असा संदेशच या कृतीद्वारे मुस्लिमांपर्यंत पोचविला. हे न पटल्याने ती महिला या कौन्सिलमधून बाहेर पडली.

गेल्या मार्च महिन्यात 'फौंडेशन फॉर इस्लामिक वेल्फेअर' अशी आणखी एक संस्था स्थापन करण्यात आली आहे. आधुनिक व सहिष्णू असा फ्रेंच-मुस्लिम समाज घडविण्याचे व सध्याच्या समाजातील अशा घटकांना एकत्र आणण्याचे उद्दिष्ट या फौंडेशनसमोर आहे. या फौंडेशनवर काही वेगळ्या व्यक्तींची निवडही करण्यात येणार आहे. आणि गंमत म्हणजे या फौंडेशनचे काम पाहण्याची जबाबदारी 'फ्रेंच कौन्सिल ऑफ मुस्लिम फेथ'च्या (CFCM) चार गटांकडेच सोपविण्यात आली आहे. या सर्व घटनांवर अमेरिकेतील हार्वर्ड विद्यापीठातील फ्रेंच इस्लामॉलॉजिस्ट जोसेलिन सेसारी यांनी एक भाष्य केले आहे. ते म्हणतात, "जे खरे मूलतत्त्ववादी गट आहेत, ते अद्याप यात कुठेच आलेले नाहीत."

'धर्माच्या मदतीने धर्मनिरपेक्षते'कडे जाण्याचे पुढचे पाऊल म्हणून मुस्लिम धर्मगुरूंसाठी युरोपीय दृष्टिकोणातून काही वेगळे प्रशिक्षण देण्याचा विचार फ्रान्सने केला. वास्तविक, असे प्रशिक्षण देणारी संस्था १२ वर्षांपासून छोट्या प्रमाणावर हे काम करीत होती. हे काम अत्यावश्यक असल्याचे मत अनेकांकडून व्यक्त करण्यात आले आहे. या प्रकारात धर्मगुरूंच्या हाती जास्त अधिकार गेले की काय अशीही चर्चा आहे. पण मुळातच असे युरोपीयकरण झालेले - 'युरोपियनाइज्ड इमाम' तयार करणे हे सोपे काम नाही. अरब जगतात शासन व धर्म यांच्यातील परस्परसंबंधांना मान्यता आहे. युरोपमध्ये मात्र शासनाचा असा सहभाग हा व्यक्तिस्वातंत्र्यावर व मानवाधिकारांवर गदा म्हणून समजला जातो. अर्थात, यातून काय साध्य होणार हे मात्र अनुत्तरित आहे.

*(संदर्भ - इंटरनेट, न्यूयॉर्क टाइम्स, द इकॉनॉमिस्ट ९ एप्रिल २००५)*

## जिकडे-तिकडे

# या ई-कचऱ्याचे करायचे तरी काय ?

कॉम्प्युटर नावाचा किमयागार आपल्या आयुष्यात नव्हता तेव्हा आपण जगत तरी कसे होतो, असा गहन प्रश्न पडावा एवढा या यंत्राने आज आपल्या जगण्याचा ताबा घेतला आहे. किंबहुना, एकूणच इलेक्ट्रॉनिक्सनामक तंत्राने आपल्या जीवनाची आरपार फेरमांडणी केली आहे. संदेशवहन, निरोपांची देवाणघेवाण, दळणवळण, जडजंबाल सांख्यिकी माहितीचे संकलन, विश्लेषण, व्यवस्थापन या सारख्या सगळ्याच बाबी खरोखरच (कॉम्प्युटरच्या माउसच्या रूपाने) आपल्या मुठीत आल्याने दैनंदिन आयुष्यातील आपले अनेक प्रश्न सुटले आहेत. परंतु, हे विधानही पूर्णांशाने खरे नाही. इलेक्ट्रॉनिक्स नावाच्या या तंत्रज्ञानाने अनेक प्रश्न हद्दपार केले असले तरी काही प्रश्न मात्र नव्याने आपल्या अनुभवकक्षेत आणून ठेवले आहेत. ई-कचरा नावाची एक नवीनच संकल्पना सध्या घोंघावते आहे. वापरातून रद्दबातल ठरलेले जुने कॉम्प्युटर, प्रिंटर्स, या यंत्रांचे निकामी झालेले सुटे भाग अशा अनेकानेक चिजांचा अंतर्भाव या ई-कचऱ्यात होतो. त्यातच भरीस भर म्हणजे या ई-कचऱ्याचे विघटनही शक्य नसल्याने त्याची विल्हेवाट लावावी तरी कशी, या प्रश्नाचे रूपांतर खरोखरच यक्षप्रश्नात झाले आहे.

वाहनांनी ओसंडून वाहणारे रस्ते, वाहतुकीची जीवघेणी कोंडी, त्यापायी होणारा विलंब आणि बळावणारे प्रदूषण, वाताहत झालेले रस्ते, विजेचा लपंडाव, पाण्याचा तुटवडा, सांडपाण्याच्या निचऱ्याची टेकीला आलेली व्यवस्था यासारख्या समस्यांनी अगोदरच गांजलेल्या बेंगळूरला आता या ई-कचऱ्याच्या ढिगाऱ्यांशीही दोन हात करावे लागत आहेत. केवळ भारतीयच नव्हे तर वैश्विक आय. टी. उद्योगाचे एक अग्रगण्य केंद्र असणाऱ्या बेंगळूरमध्ये माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या अदमासे १६०० कंपन्या आहेत. यातील तब्बल ५०० कंपन्या तर बहुराष्ट्रीय आहेत. अब्जावधींची उलाढाल करणाऱ्या आणि लक्षावधींना रोजीरोटी पुरविणाऱ्या या कंपन्यांमधून वर्षाकाठी टनावारी ई-कचरा बाहेर पडतो, हे वास्तव आता सर्वच स्तरांवर बोचू लागले आहे. या ई-कचऱ्यात अक्षरशः सोने दडलेले असते. प्लास्टिक, शिसे, तांबे, पारा यासारखे

मूल्यवान घटक या ई-भंगारात दडलेले असल्याने या कचऱ्याला मोल मात्र कचऱ्याचे राहत नाही. कॉम्प्युटरच्या जुळणीमध्ये वापरण्यात येणारे जे कनेक्टर्स असतात त्या कनेक्टर्सवर सोन्याचा पातळ मुलामा दिलेला असतो. भंगारात काढलेल्या एका कॉम्प्युटरमधून अर्धा ग्रॅम सोने हस्तगत करता येते. परिणामी, या ई-कचऱ्यावर प्रक्रिया करून त्यातून फेरविक्रीयोग्य चिजा वेगळ्या करण्याचा एक मोठा उद्योगच आजमितीस बेंगळूरमध्ये आकारास आला आहे.

परंतु, यामुळे मूळ समस्या संपत नाही. कर्नाटक राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या एन्व्हायर्नमेंट मॅनेजमेन्ट अॅन्ड पॉलिसी रिसर्च इन्स्टिट्यूट या संस्थेने केलेल्या एका अभ्यासानुसार आगामी १० वर्षांत बेंगळूरमधील या अशा सायबर कचऱ्याच्या प्रमाणात लक्षणीय वाढ अपेक्षित आहे. प्रक्रिया करून का होईना, पण या वाढीव कचऱ्याची विल्हेवाट लावावी तरी कशी, ही दुसरीच डोकेदुखी आता निर्माण होऊ पाहत आहे. हा कचरा साठवण्यापासूनच या अडचणींची मालिका सुरू होते. वाढत्या घरबांधणीपायी शहरातील मोकळ्या जागेचा संकोच होतो आहे. त्याहीपेक्षा महत्त्वाची बाब म्हणजे, या ई-कचऱ्यावर प्रक्रिया करून त्यातून फेरविक्रीयोग्य जिनसा वेगळ्या करण्याचा उपक्रम पर्यावरणाच्या मुळावर उठत असल्याचे अनुभवास येते आहे. कॉम्प्युटरमधील प्रिंटेड सर्किट बोर्डवर बसविलेल्या कनेक्टर्समधून सोने वेगळे करण्यासाठी हायड्रोक्लोरिक आम्ल आणि नायट्रिक आम्ल यांचे मिश्रण वापरले जाते. दिवस मावळताना हे सारे मिश्रण उघड्यावरच विसर्जित केले जाते. परिसरातील माती तसेच झाडझाडोऱ्याच्या हानीस हे मिश्रण कारणभूत ठरत असल्याचे आढळून आल्याने आता याबाबतही प्रश्नचिन्ह उभे राहावे, हे ओघानेच येते.

कॉम्प्युटरनिर्मितीच्या तंत्रज्ञानात सुधारणा घडून येण्याचा वेगही अचंबित करणारा आहे. ई-भंगारात भर पडण्याच्या वेगातही त्यामुळे वाढ झाली आहे. या सगळ्यात खरी चिंताजनक बाब आहे ती निराळीच. दिवसागणिक वाढणाऱ्या या सायबर कचऱ्याची विल्हेवाट कशी लावावयाची यासंदर्भातील धोरणच आज कोठेही अस्तित्वात नाही - ना सरकारकडे ना या क्षेत्रातील खाजगी उद्योगांकडे. बरे, करविषयक सवलतींचा लाभ उठवत करमुक्त आयात केलेले कॉम्प्युटर आय. टी. कंपन्यांना उघडउघड भंगारातही काढता येत नाहीत. साराच गुपचुपीचा मामला!

*(संदर्भ - डाऊन टू अर्थ व हिंदू )*

(पान ११ वरून)
(capital adequacy ratio) लागू करावे लागल्यामुळे स्पर्धात्मकता टिकविणे अडचणीचे ठरेल.

जोखीम असणाऱ्या व्यवहारांचे व्यवस्थापन आणि त्यासंबंधातील बचाव व्यवहार (hedging) यांच्यात सुधारणा करण्यासाठी विविध, व्यापक वित्तीय साधने उपलब्ध होऊ शकली तर परिणामस्वरूप वित्तीय स्थैर्यातही सुधारणा होऊ शकेल. जर भाववाढीच्या निर्देशांकाशी जोडलेले सरकारी कर्जरोखे (inflation-indexed government bonds) तसेच भाववाढीच्या निर्देशांकाशी जोडलेली बचतीची साधने (inflation-indexed saving instruments) अस्तित्वात आणली तर दीर्घ मुदतीसाठी बचत करणाऱ्यांना भाववाढ, भाववाढीपायी निर्माण होणाऱ्या जोखीमा व धोके आणि व्याज दरातील चढउतार यासारख्या अनिश्चिततांपासून मुक्त करता येईल. तसेच आता शेअर बाजारातील घडामोडींचा एकूण वित्तीय स्थैर्यावर वाढत्या प्रमाणात परिणाम होऊ लागला असल्यामुळे शेअर बाजाराच्या स्थैर्याचे महत्वही वाढले आहे. त्यामुळे सध्याच्या काळात व्याज दरांमधील अनिश्चितता वाढण्याची शक्यता असल्यामुळे व्याजदरावर आधारलेले वायद्याचे सौदे (interest-rate futures) करण्याची मुभा दिल्यास रोख्यांच्या किंमतीतील चढ-उतार कमी करता येतील. आणि या सर्वांचा एकत्रित, अंतिम परिणाम म्हणून वित्तीय स्थैर्य प्रस्थापित होऊ शकेल.

या संपूर्ण चर्चेच्या पार्श्वभूमीवर दीर्घकालीन स्वरूपाचे काही प्रश्न मात्र अनुत्तरित राहिले आहेत. शेती क्षेत्राला होणाऱ्या कर्ज पुरवठ्यात कशी वाढ करता येईल ? एकूणच सहकारी पत -पुरवठा पध्दती आणि विशेषत: नागरी सहकारी बँका मजबूत कशा करता येतील ? यासारख्या दीर्घकालीन किंवा, विकासाशी संबंधित असणाऱ्या मुद्यांच्या बाबतीत रिझर्व्ह बँकेचे धोरण विधान (policy statement) सध्या तरी मौन धारण करून बसले असल्यासारखे वाटते. या धोरणाच्या नियंत्रणात्मक आणि विकासात्मक अंगांचा मध्यम-कालीन आढावा घेतला जाईपर्यंत तरी हे मुद्दे लांबणीवरच टाकले गेले आहेत, असे वाटते.

**

(१) **M3** - पैशाच्या या एककात लोकांजवळील रोकड, बँकांकडील मागणी ठेवी तसेच मुदत ठेवी आणि रिझर्व्ह बँकेकडील अन्य ठेवी यांचा समावेश होतो.

(२) **P**- किमतींच्या स्तराचा निर्देशांक

INDIAN SCHOOL OF ECONOMY
LIBRARY

# कालचे आजसाठी

बा.सी. मर्ढेकर हे मराठी काव्यविश्वात युगकर्ते म्हणून मान्यता पावलेले कवी. आजूबाजूच्या सामाजिक जीवनाला सरळसरळ सामोरे जाऊ न भिडणारे कवी. अत्यंत आशयगर्भ कविता लिहिणारे आणि आपल्या वैशिष्ट्यपूर्ण अभिव्यक्तीने वाचकांना विचार करायला भाग पाडणारे कवी.

मर्ढेकरांच्या कवितेत राजकारण फारसे नाही. परंतु षष्ट्यब्दी ओलांडलेल्या कवितांमधून व्यक्त होणारे प्रतिध्वनी आजही आपल्या कानांवर पडतात.

मर्ढेकरांचा एक अभंग असा आहे.

जे न जन्मले वा मेले । त्यांसी म्हणे जो आपुले,
तोचि मुत्सद्दी जाणावा । देव तेथें ओळखावा।।
मोले धाडी जो मराया । नाही आसूं आणि माया,
त्यासी नेता बनवावे । आम्हा मेंढरास ठावे ।।

नेता कोणास बनवावे याबाबतचा मर्ढेकरांचा सल्ला आजची आमच्यासारखी मेंढरे तंतोतंत पाळताना दिसतात. दिन -रात चालणारे या नेत्यांचे प्रताप, 'नाही आसूं आणि माया' याच सदरांत मोडणारे असल्याचे अनुभव आपण सर्वच घेत आहोत. सारेच नेते मुत्सद्दी असतात; आणि असल्या -नसल्या कुणालाही आपलेसे करण्याचे त्यांच्या अंगचे देवपण आपण आज अनुभवत आहोतच. मर्ढेकर, खरंच तुम्ही द्रष्टे कवी होता !

**अर्थबोधपत्रिकेचा फेब्रुवारी- मार्च २००५ चा जोडअंक मेंदूसंशोधन विशेषांक म्हणून प्रसिद्ध झाला आहे. या जोडअंकाची किंमत ४० रुपये एवढी आहे. मात्र जानेवारी २००५ पासूनची वर्गणी भरणाऱ्यांना हा विशेषांक वार्षिक वर्गणीतच (१०० रुपये) मिळू शकेल.**




## अर्थबोधपत्रिका वर्गणीदारांसाठी विशेष योजना

(१५ ऑक्टोबर २००४ पासून)

| | |
|---|---|
| वार्षिक वर्गणी | फक्त १००/ - रुपये |
| द्वैवार्षिक वर्गणी | फक्त १८०/ - रुपये |
| त्रैवार्षिक वर्गणी | फक्त २६०/ - रुपये व एक पुस्तिका भेट |
| पंचवार्षिक वर्गणी | फक्त ४००/- रुपये व दोन पुस्तिका भेट |

**पुस्तिका -** (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न, लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत तीस रुपये) (२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण, (इंग्रजी पुस्तिका) लेखक - जयकुमार अनगोळ (किंमत तीस रुपये) (३) सक्तीचे प्राथमिक शिक्षण, (मराठी पुस्तिका) लेखक - जयकुमार अनगोळ, अनुवाद - प्रा. रमेश पानसे (किंमत तीस रुपये) (४) शोध घेते ते शिक्षण, लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत - पन्नास रुपये) (५) गव्हर्नन्स, सुपरव्हिजन अँड मार्केट डिसिप्लिन लेसन्स फ्रॉम एन्रॉन (इंग्रजी पुस्तिका) लेखक - जयंत वर्मा (किंमत शंभर रुपये)

# अर्थबोधपत्रिका पुरवणी

## नागरीकरण व झोपडपट्ट्या

(कुमुदिनी दांडेकर)

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात विकसित देशांत नागरी लोकसंख्या दुप्पट झाली. विकसनशील देशांत मात्र ती सहासात पट झाली. त्या तुलनेत भारतात ती चौपट झाली; मात्र टक्केवारीने दुप्पटही झाली नाही. परंतु, जी नागरी लोकसंख्या वाढली ती, निदान महानगरांत तरी झोपडपट्ट्यांत राहिली. उदाहरणार्थ, महाराष्ट्रात, इतर राज्यांपेक्षा नागरीकरण पूर्वीपासूनच बरेच जास्त होते. तरी तेथेही नागरी लोकसंख्या दुप्पट झाली नाही. पण, मुंबईसारख्या महानगरात निम्मी लोकसंख्या आजमितीस झोपडपट्ट्यांत राहात आहे.

नागरीकरणाची बहुतांश बैठक आर्थिक आहे. जेव्हा नगरांत किंवा महानगरांत उद्योगधंद्यांची वाढ होते, तेव्हा ग्रामीण लोक नगरांकडे आकर्षित होतात. ग्रामीण भागापेक्षा शहरांमध्ये जास्त सुखसोयी उपलब्ध होऊन खेड्यांमधून शहरात आल्याने गुणात्मक वरच्या दर्जाचे जीवनही उपभोगता येते, अशी कल्पना होती किंवा निदान पुढारलेल्या पाश्चात्य देशांचा तो अनुभव होता. पण, आज भारतात मुंबई किंवा दिल्लीसारख्या शहरांची लोकसंख्या कोटीच्यावर असली तरी त्यातील निम्मी जनता झोपडपट्ट्यांत राहते आहे. अशा प्रकारच्या नागरीकरणाला सुदृढ आर्थिक पाठबळ आहे, असे म्हणता येत नाही.

मुंबई महानगरातील झोपडपट्ट्यांत राहणाऱ्या सुमारे पाच हजार लोकांची एक पाहणी १९९८ - ९९ मध्ये करण्यात आली. या जनसमूहांचे आरोग्य, स्वच्छतेच्या सवयी, सोयी -सुविधा, आहार व त्याचे पोषणमूल्य यासारख्या पैलूंचा अभ्यास या पाहणीत करण्यात आला.या पाहणीमुळे जनसमूहांची (१) झोपडपट्टीत राहणारे (२) मुंबईत इतरत्र राहणारे व (३) महाराष्ट्राच्या ग्रामीण भागांत राहणारे - अशी विभागणी

करून त्यांची आर्थिक व सामाजिक परिस्थिती - शिक्षण, व्यवसाय, सांडपाण्याच्या निचऱ्याची व्यवस्था, पिण्याचे पाणी, संडासची सोय वगैरेबाबत तुलना करणे अहवालाच्या माध्यमातून शक्य झाले. त्याचबरोबर स्त्रिया आपले व्यावहारिक निर्णय घ्यायला कितपत मुक्त आहेत, पुरुषांची व्यसनाधीनता, स्त्रियांना मारहाण, कुटुंब नियोजनाबद्दलची आस्था यांसारख्या पैलूंबाबतही या पाहणी-अहवालात माहिती देण्यात आली. या लोकांचे आरोग्य व त्यासाठी मिळणाऱ्या सुविधा याचीही कल्पना आली. वरील तीन विभागांची तुलना करता असे लक्षात आले की झोपडपट्ट्यांतले जिणे हे मुंबईत इतरत्र राहणाऱ्यांपेक्षा निकृष्ट दर्जाचे असले, तरी ग्रामीण महाराष्ट्रापेक्षा ते बरेच सुखाचे होते. आर्थिकदृष्ट्याही थोडेसे उच्च दर्जाचे होते. पिण्याचे पाणी, वीज, घरामध्ये बरीचशी विजेची उपकरणे असणे, गॅस, रेडिओ, टी.व्ही. असणे, इत्यादी अनेक बाबींमुळे त्यांचे जीवन सुसह्य बनले होते. फक्त संडासच्या सुविधेतच काय ती कमतरता होती. पण, ग्रामीण भागातही ती व्यवस्था सोयीची होती असे नाही. परंतु ग्रामीण भागांत जेवढे मोकळे रान उपलब्ध होते, तितके साहजिकच झोपडपट्ट्यांत उपलब्ध नव्हते.

या झोपडपट्ट्यांत बहुतांशी झोपडपट्ट्या अधिकृत असल्याने, काही अधिकृत झोपडपट्ट्या व इतर अनधिकृत वस्त्या -म्हणजे रस्त्याच्या कडेला राहणारे लोक, रस्त्यांवरील मोठाले मोकळे नळ, पुलांच्या कमानींखालील भाग अशा ठिकाणी वस्ती केलेले लोक (ज्यांचीही संख्या दहा -पंधरा लाखांपलीकडे आहे)- त्यांचीही एक पाहणी पहिल्या अभ्यासाच्या पार्श्वभूमीवर केली गेली. या दुसऱ्या पाहणीत एक हजारावर कुटुंबे व ५२०० लोक होते. व्यक्तीचा दरडोई खर्च दिवसाला २४ रुपयांपेक्षा कमी असल्यास अशा व्यक्ती दारिद्र्यरेषेखालील जीवन कंठत आहेत, अशी व्याख्या केल्यास, ३८.५ टक्के लोक या रेषेखाली राहात होते. महाराष्ट्रातील नागरी भागांत १९९० साली हे प्रमाण ३७.५ टक्के इतके होते. तर भारताच्या नागरी भागांत हे प्रमाण ३२.४ टक्के इतके होते. याचा अर्थ झोपडपट्ट्यांतील सर्वच लोक दारिद्र्यरेषेखाली नव्हते. परंतु झोपडपट्ट्यांतील मनुष्य वस्तीचे इतर कोठलेही परिमाण खालच्या दर्जाचेच होते. ग्रामीण भागांत ते याहीपेक्षा निकृष्ट दर्जाचे असले पाहिजे. म्हणूनच हे लोक मुंबईत येऊन राहिले होते. थोडक्यात, ग्रामीण भागातील गरिबी महानगरात येऊन चव्हाट्यावर उभी होती.

वरील झोपडपट्ट्यांत गेल्या काही वर्षांत १२ हजार संडास बांधले गेले होते. त्यापैकी ३० टक्के संडास तुंबून गेल्याने वापरातून बाद झाले होते. या ठिकाणी एकूण

एक लाख संडासांची मागणी होती. या वस्तीत आरोग्याचे चित्रही काळजी करण्यासारखे होते. एकाच उदाहरणाने त्याचे मोजमाप लक्षात येण्यासारखे आहे. येथे क्षयाचे प्रमाण हजारी ७ ते १८ इतके आढळले. सरासरीने मुंबईत ते हजारी ३.३ तर भारतात ते ४.२ इतके होते.

'युवा' नावाच्या संघटनेने केलेल्या एका पाहणीनुसार मुंबईमध्ये दर माणशी १३५ लिटर पाणी रोज मिळत असले तरी चाळीतील निम्न मध्यमवर्गाला ते ९० लिटर इतके मिळत असावे. परंतु झोपडपट्ट्यांच्या पाहणीतून ते माणशी २८ लिटर इतकेच मिळत असल्याचे दिसून आले. पाण्याची टंचाई ही सर्व महानगरांतच नव्हे तर ग्रामीण भागांतही भरपूर प्रमाणात आहे. दिल्लीमध्ये जवळूनच वाहणाऱ्या यमुना नदीचे पाणी पूर्ण खेचल्यावरही पाण्याची कमतरता दूर न झाल्याने गंगा व बिआस नद्यांचेही पाणी ओढून घेतले जात आहे. हे फार काळ चालू शकणार नाही. अलीकडे, काही राज्ये याविरूद्ध तक्रारी घेऊन न्यायालयात जात आहेत. हैदराबादसारख्या महानगरात एक मिनिट नळ चालू ठेवल्याने नऊ लिटर पाणी खर्च होत असल्याने, नळाऐवजी 'मग'ने पाणी वापरा, म्हणून बऱ्याच हॉटेलांत सुचवितात. बऱ्याचशा खेड्यांमधून दर दिवशी माणशी अठरा लिटरही पाणी मिळत नसल्याचे लक्षात आलेले आहे. थोडक्यात, लोकसंख्येच्या प्रचंड भाराने भारतात पाण्याची टंचाईही सतत वाढत राहणार आहे.

सारांश, स्थलांतरणाद्वारे वास्तव्यासाठी येणाऱ्या सर्वांना साधनसुविधा (infra-structure) पुरविणे हे महानगरांच्या आवाक्यातील नाही. तेथे येणाऱ्या लक्षावधी लोकांना महानगरांनी आपल्या आर्थिक मजबुतीने म्हणजे उद्योगधंद्यांच्या वाढीने आकर्षित केलेले नसून ग्रामीण भागांतील निकृष्ट आर्थिक परिस्थितीने, त्यांना तेथून गांजून हुसकावून लावलेले आहे. यापूर्वी प्रतिपादन केल्याप्रमाणे झोपडपट्टीतील जिणेही सुसह्य वाटण्याइतपत ग्रामीण भागांत सुखसोयींची वानवा भासत असली पाहिजे. नाहीतर हे लोक महानगरांमध्ये आले नसते.

साहजिकच मग असा प्रश्न उभा राहतो की, भारतात गेल्या पन्नास वर्षांत, दहा पंचवार्षिक योजना झाल्या; त्याद्वारे वरील वास्तवासंदर्भात काहीच केले गेले नाही का ? याचे उत्तर शोधण्यासाठी या योजनांच्या माध्यमातून शेतीत किंवा बिगरशेती उद्योगधंद्यांत काय केले गेले आहे, हे आपण थोडक्यात पाहू:-

शेतीधंद्यावर १९५० पूर्वीच अमाप लोकसंख्या (एकूणांतील ७० टक्के) अवलंबून होती. याची जाण पुढाऱ्यांना होतीच; पण इतरांनाही ती तशी होती. उदाहरणार्थ,

'भोर समिती' (१९४६) अहवालानेही याबाबत इशारा दिला होता. ही लोकसंख्या शेतीत सामावून घेणे शक्य नव्हते. बिगर शेती उद्योग-व्यवसायांचा पसारा सामावून घेणाऱ्या नगरा -महानगरांनी आणि त्यांच्या विस्तारामधून साकारणाऱ्या नागरीकरणानेही झोपडपट्ट्यांचे जिणेच त्यांना देऊ केले. परंतु, नगरांमध्ये राहणीमान उंच असल्याने तेथील वास्तव्याचा या स्थलांतरितांना मोह पडला. मात्र, या लोकांना शहरांत स्थायिक करण्यापेक्षा ग्रामीण भागांतच ठेवणे हिताचे होते.

पहिल्या दोन पंचवार्षिक योजनांत जमिनीसंबंधी कायदे केले गेले व लोकांमधील साक्षरतेचे प्रमाण वाढवून त्यांचा गुणात्मक विकास घडवून आणण्यास प्रारंभ झाला. उचित अशा कायदेकानूंच्या माध्यमातून पूर्वीची सरंजामशाही रोखण्याचा प्रयत्न झाला. 'कसेल त्याची जमीन' असा कायदा झाल्याने कसणाऱ्याला दिलासा मिळाला. एक जण किती जमीन मालकी हक्काने स्वतःकडे ठेवू शकतो, यावर नियंत्रण आल्याने फुकट चाललेल्या बऱ्याचशा जमिनीचा उपयोग होऊन जमिनीचे उत्पन्न वाढेल असे वाटले तरी ती वाढ लोकसंख्येच्या वाढीपुढे कमीच राहिली. शेतमजुरांना काही किमान मजुरी देण्याचे कायद्याने (१९४८) ठरले तरी त्या कायद्याची अंमलबजावणी कधीच झाली नाही. त्यासाठी शासनाने, कायद्यानुसार निर्धारित झालेल्या किमान दराने मजुरी देऊन त्यांना इतर कामास लावणे जरूर होते. तसे करण्याने शेतमजुरीचे दर वरच्या पातळीवर राहिले असते. त्यातच पुन्हा, कायद्याने ठरलेली मजुरी देऊन काम करून घेण्याइतपत शेतमजूरही सुदृढ नाहीत, असे जमिनमालकांना वाटे. त्यांच्याकडून काम करून घेणे होत नव्हते. शिवाय शेतीतून मिळणारे निव्वळ उत्पन्न शेती सुधारण्यासाठी खर्च करण्याऐवजी दुकानदारी किंवा अशा अन्य बिगरशेतकी पर्यायांत गुंतवून शेतीपेक्षा बराच जास्त पैसा निर्माण करण्याकडे लोकांचा कल होता. शेतमजुरांना पुरेसे काम न मिळाल्याने हलाखीच्या स्थितीत त्यांना शहरांकडे धाव घ्यावी लागली. पहिल्या दोन - तीन योजनांत गरीब शेतकऱ्याची बाजू घेतली गेली तरी शेतकीतंत्रात मात्र फारशी सुधारणा झाली नाही.

१९६५ मध्ये मात्र मेक्सिकोमध्ये वीस वर्षे वापरात असलेल्या ठेंगू गव्हाच्या जाती भारतात वापरण्यास सुरूवात झाली व गव्हाचे उत्पन्न घसघशीतपणे वाढले. शेतकी तंत्रात उपयुक्त असे हेच तंत्रज्ञान प्रथम वापरले गेले. त्यानंतर तांदूळ, मका याबाबत तशाच प्रकारचे तंत्र वापरून शेतीचा विकास झाला. पण त्यामुळे शेतीवर अवलंबून असलेली व झपाट्याने वाढणारी अवाढव्य लोकसंख्या पोटापाण्याला लावता

आली नाही. या लोकांना साक्षर करणेही जमले नाही. त्या ठिकाणी शासनाचे जबाबदार व समंजस मनुष्यबळ तसेच आर्थिकबळही कोते ठरले.

चीनमध्येही अवाढव्य लोकसंख्या होती व चीनही आपल्या देशासारखाच पूर्वी गरीब होता. पण त्याने साक्षरता मोहीम ३० वर्षांत यशस्वी केली. याउलट, भारतात लोकसंख्येचे अवाढव्यत्त्व व अडाणीपण सतत कोठल्याही कामात अडथळाच आणीत राहिले. अडाणीपणामुळे या लोकांमध्ये स्वतःचे चांगले - वाईट समजण्याची पात्रता आली नाही व कुटुंबनियोजनही अयशस्वी ठरले. आज 'बिमारू' (बिहार, मध्य प्रदेश, राजस्थान, उत्तर प्रदेश) राज्ये (ज्यांत भारताची ४० टक्के लोकसंख्या सामावलेली आहे) हजारी २१ या दराने वाढताहेत, तर चीन हजारी ७ या वेगाने वाढण्याची आकांक्षा धरून आहे.

वरील परिस्थितीतील लोकांना नागरी भागांत सोयी उपलब्ध करून देणे शक्य नाही. या सर्वांना ग्रामीण भागांतच परंतु बिगर शेती उपक्रमांत, अशा उपक्रमांच्या विकासात गुंतविणे जरूर आहे. ग्रामीण भागातले रस्ते तयार करणे, घरे उभी करणे, मृद्संधारणाची कामे करणे, गावांची साफ -सफाई करणे, छोटी -मध्यम सिंचनाची साधने निर्माण करणे यावर भर देऊन ग्रामीण विकास साधण्यास अग्रक्रम देणे अगत्याचे आहे. ते आजपर्यंत झालेले नाही. काही ठिकाणी रोजगार हमी योजना, जवाहर रोजगार योजना वगैरे सुरू केल्या तरी ज्या जोमाने, कळकळीने व हिरीरीने ते करावयास हवे होते तसे केले गेले नाही. कोट्यवधींनी त्यात गुंतवणूक झाली; परंतु, भ्रष्टाचारापायी वस्तुस्थिती बदलली नाही किंवा या गुंतवणुकीचे लाभ ज्या समाजसमूहांपर्यंत पोचणे अपेक्षित होते त्यांच्यापर्यंत ते पोचले नाहीत. जितकी गुंतवणूक मोठी तितकी भ्रष्टाचाराला मोठी जागा मिळाली.

प्रा. वि. म. दांडेकरांनी आपल्या एका पुस्तकात शेतीक्षेत्राबाबतच्या भविष्यकालीन धोरणासंदर्भात लिखाण केले आहे. ते यासंदर्भात विचार करण्यासारखे आहे. पन्नास वर्षांपूर्वी जमिनीसंबंधी केलेले कायदे त्या वेळी थोडेफार उपयोगी पडलेसे वाटले तरी जगाच्या बाजारात आज तग धरण्यास त्यात बदल करणे जरूर असल्याचे निरीक्षण ते नोंदवितात. शेतीच्या उत्पादनतंत्रातही आता खूप विकास घडून आला आहे. ग्रामीण भागात केवळ देशीच नव्हे तर परदेशी भांडवल आकर्षित करण्यासाठी शेतीव्यवसाय चहूंअंगांनी सुधारणे, फळे -भाज्या -फुले यांचे उत्पादन तसेच मांस-मत्स्याचे उत्पादन निर्यात करता यावे याकरिता अतिशय उच्च दर्जाची स्वच्छता सांभाळणे, पॅकेजिंग

करणे यासारख्या बाबी शिकणे हे अत्यंत आवश्यक आहे, असे ते सुचवितात. त्यासाठी जरूर तर परकीय मदत व भांडवल, परदेशी गुंतवणूकदारांना प्रसंगी थोडे झुकते माप देऊनही भारतात आकर्षित करणे जरूर आहे. त्यासाठी कायदे बदलणे किंवा भांडवली गुंतवणूक करणाऱ्यांना आश्वस्त बनविण्यासाठी जमिनीची मालकीही त्यांच्याकडे सोपविण्याची सोय करणे आवश्यक असल्याचे प्रा. दांडेकर सुचवितात. किंचित झुकते माप देण्याने थोडे नुकसान झाले तरी स्वच्छ, जंतूविरहित, आरोग्यपूर्ण जिनसांच्या निर्यातीसाठी लागणारी तंत्रे ग्रामीण लोकांत रूजविणे जरूर आहे व ते काम अशा परदेशी मदतीने होऊ शकेल. हे एक प्रकारचे प्रशिक्षणच आहे.

वरील प्रयोग यशस्वी झाला तर ग्रामीण माणूस ग्रामीण भागातच राहून दीनवाणे जिणे न जगता आत्मविश्वासाने व प्रतिष्ठेने जगाच्या बाजारात उभा राहू शकेल.

आपल्या बिगरशेती उद्योगांतही पहिल्या दोन -तीन योजनांत परदेशी तंत्रज्ञान व परकीय भांडवल यापासून दूर राहण्याचा प्रयत्न झाला. त्यात लहान प्रमाणावर गुंतवणूक करून उद्योगधंद्यांचे आकारमान छोटे ठेवून त्यांच्या उत्पादनांवर मोठ्या कारखानदारांनाही अवलंबून ठेवले गेले. ही निर्मिती मुख्यतः श्रमप्रधान (लेबर इंटेन्सिव्ह) राहून काळाच्या ओघात निकृष्ट राहिली तरी शासनाने तिला आधार दिला व परकीय आयातीवर नियंत्रक कर लादले. त्यामुळे स्थानिक उत्पादने खालच्या दर्जाची राहून जगाच्या बाजारात त्यांचे स्थान लुळे पडले. अशा परिस्थितीत निर्यात करून परकीय चलन मिळविणे कठीण झाले व निर्मिती तंत्रेही मागास राहिली. याच वेळी चीन व इतरही बरीच विकसनशील राष्ट्रे व्यापारात पुढे गेली आणि त्यांचे राहणीमान उंचावले.

गेल्या १०-१५ वर्षांत जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत भारत सहभागी होतो आहे व जगाच्या स्पर्धेत तो सामीलही झाला आहे. पण हे फार उशिरा. बिगरशेती उद्योग - व्यवसायांत आपण स्पर्धापात्र होऊ शकू पण ते प्रचंड लोकसंख्येला मजबूत आधार देऊ-न किंवा देशातील मनुष्यबळाला सुयोग्य शिक्षण - प्रशिक्षणाची झळाळी चढवून. आता हेही पुन्हा कितपत शक्य आहे, हे पाहावयाचे. कारण, यापुढे श्रमप्रधान तंत्रेच वापरातून हद्दपार होणार आहेत.

# ग्रंथालयातील नवी पुस्तके

Energizing Rural Development through 'Panchayats'- by Bibek Debroy and P.D. Kaushik (eds); Published by - Academic Foundation in collaboration with Rajiv Gandhi Institute for Contemporary Studies, New Delhi; pp- 488, Price-Rs.795/-

२००१ च्या जनगणनेनुसार ७२.२२ टक्के भारतीय लोक ग्रामीण भागात राहतात. असे म्हणताना, 'ग्रामीण भागात राहणे अवांछनीय आहे' - असा एक सुप्त सूर असतो. पाश्चात्य, विकसित राष्ट्रांमध्येही काही लोक ग्रामीण भागात राहात असतातच (उदाहरणार्थ - अमेरिका - २३ टक्के). पण तिथे ते कमीपणाचे मानले जात नाही. अर्थात, किती टक्के लोक ग्रामीण भागात राहतात, हा महत्त्वाचा मुद्दा नसतोच. ज्या ग्रामीण भागात लोक राहतात, त्या भागात भौतिक / सामाजिक स्वरूपाच्या पायाभूत सुविधांचा जवळजवळ संपूर्ण अभाव असतो - हा महत्त्वाचा मुद्दा. घरे, शाळा, रस्ते, पाणी, वीज, आरोग्य -अशा मूलभूत सुविधांचे दुर्भिक्ष असते. अशा परिस्थितीत, त्या भागाचा विकास कसा होईल ? विकासाला आवश्यक ऊर्जा कोणती ? ती पुरवायची जबाबदारी कुणाची ? ती पुरेशी पार पाडली जाते का ? नसल्यास, पर्याय काय ? असे अनेक प्रश्न मनात पिंगा घालायला लागतात.

ग्रामीण भागाचा विकास साधायचा असेल तर त्या भागात मुख्य असणारे शेती -क्षेत्र बळकट करायला हवे; त्याचे विविधीकरण व्हायला हवे; शेती -उत्पादनावर प्रक्रिया करणारे उद्योग, शहरांपेक्षा, ग्रामीण भागातच स्थापले जावेत; त्यामुळे ग्रामीण रोजगारी निर्माण होईल, लोकांची उत्पन्ने, त्यांची क्रयशक्ती वाढेल आणि ग्रामीण विकासाला गती येऊ शकेल.

पण हे सगळे करायचे कोणी ? ग्रामीण विकासासाठी सरकारी आणि बिनसरकारी अशा अनेक संस्था कार्यरत आहेत. पण त्यांच्यापेक्षाही पंचायत राज संस्थांनी यात अधिक पुढे यावे, अशी अपेक्षा आहे. खरे तर, राज्यघटनेच्या '२४३-जी' या कलमानुसार, विकास हे त्यांचे प्राथमिक कर्तव्य आहे. ग्रामीण विकासाला आवश्यक असणारी ऊर्जा पंचायत राज संस्थाच पुरवू शकतील, असा एक विश्वास आहे. Energizing Rural Development through 'Panchayats' हे शीर्षक म्हणूनच अर्थपूर्ण आहे. ग्रामीण विकासाचे नेमके महत्त्वाचे मुद्दे कोणते आहेत; पंचायत संस्था या संदर्भात काय करू शकतात अशा प्रश्नांची बऱ्यापैकी ओळख या पुस्तकातून होते.

RNI, Regn.No. MAHMAR/2002/9806
Declaration Ref. P.H.M./S.R./61/VIII/2003
Postal Regn.No.PR/RNP/PNW/M/231/2003-2006
L.W.P. LICENCE NO. L-502

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■ 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■ भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■ अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग - व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■ इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य / पत्रके / पुस्तिका योग्य नमुन्यांत तयार करून प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■ संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते. ■ संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ■ अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

## - संस्थेचे नियंत्रण मंडळ -

•अजित कर्णिक •विकास चित्रे •कुमुदिनी दांडेकर
•ललित देशपांडे •द.ना. धनागरे •आनंद नाडकर्णी •रमेश पानसे
•मनोहर भिडे •नीळकंठ रथ •के. एन्. राज •व्ही.एम्.राव •ए.वैद्यनाथन
•सत्यरंजन साठे •रामदास होनावर •योगेंद्र यादव

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक रामदास होनावर यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : रमेश पानसे**